। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २२२ वा । बुधवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR


(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## मतदान लोकशाही बळकट करण्याचा मार्ग : पंतप्रधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : भारताच्या ७६ व्या संविधान दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व जनतेला उद्देशून एक खुले पत्र लिहिले आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताने संविधान स्वीकारले होते. पंतप्रधान मोदींनी सांगितले की, २०१५ साली त्यांच्या सरकारने संविधान या पवित्र दस्तावेजाचा सन्मान करण्यासाठी २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस घोषित केला.**



पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, माझ्यासारखा एका सामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातून आलेल्या व्यक्तीला सलग २४ वर्षांपासून अधिक काळ सरकारमधील प्रमुख म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली. हे केवळ संविधानाच्या शक्तीमुळे होऊ शकले. २०१४ साली जेव्हा पहिल्यांदा संसदेत आलो तेव्हा, लोकशाहीच्या या महान मंदिराच्या पायऱ्यांना नतमस्तक होऊन स्पर्श केल्याचा क्षण मला आजही आठवतो.

तसेच २०१९ मध्ये निवडणुकीच्या निकालानंतर जेव्हा मी संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये (मध्यवर्ती सभागृहात) प्रवेश केला, तेव्हा संविधानासमोर नतमस्तक होऊन त्याची प्रत कपाळाला लावली होती. या संविधानाने माझ्यासारख्या इतर अनेकांना स्वप्न पाहण्याची ताकद आणि त्या दिशेने काम करत राहण्याची करण्याची ऊर्जा दिली, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

मतदानाचे महत्त्व विशद करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आपल्या संविधानाने आपल्याला मतदानाचा अधिकार दिला आहे. नागरिक म्हणून आपल्या नावाची नोंद असलेल्या राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक निवडणुकांमध्ये मतदान करण्याची संधी आपण कधीही गमावू नये. हे आपले कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या युवकांसाठी आपण दर २६ नोव्हेंबर रोजी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विशेष समारंभ आयोजित करण्याचा विचार करू शकतो.

या शतकाचा प्रारंभ होऊन २५ वर्षे उलटून गेली आहेत. आतापासून अवघ्या दोन दशकांनी आपण भारतीय स्वातंत्र्याची १०० वर्षे साजरी करणार आहोत. वर्ष २०४९ मध्ये संविधान स्वीकृतीला शंभर वर्षे पूर्ण होतील. आपण आखत असलेली धोरणे, आपण आज घेत असलेले निर्णय आणि आपल्या सामूहिक कृती येणाऱ्या पिढ्यांचे जीवन घडवतील, असेही पंतप्रधान मोदी या पत्रात म्हणाले.

**तेव्हा संविधानाला मान मिळाला नाही**

मागच्या सरकारच्या काळात संविधानाचा मान राखला गेला नाही, असेही पंतप्रधान मोदींनी या पत्रातून ध्वनित केले. ते म्हणाले, मला २०१० मधील घडमोडी आठवतात. त्याच वर्षी भारताच्या संविधानाला ६० वर्षे पूर्ण झाली होती. दुर्दैवाने, त्या वेळी या घटनेला राष्ट्रीय स्तरावर महत्व दिले गेले नाही. परंतु, संविधानाबद्दल आपली सामूहिक कृतज्ञता आणि वचनबद्धता व्यक्त करण्यासाठी, आम्ही गुजरातमध्ये 'संविधान गौरव यात्रा' आयोजित केली होती. हत्तीवरून संविधानाच्या प्रतीची मिरवणूक काढली गेली. माझ्याबरोबर समाजातील विविध क्षेत्रांमधील अनेक लोकांना या मिरवणुकीचा भाग होण्याचा मान मिळाला होता.

## विक्रांत दूरावले.. तरी काँग्रेसला फरक पडणार नाही!







**लातूर/प्रतिनिधी** : लातूरातील राजकिय घडामोडी वाढल्या आहेत. त्यात विक्रांत गोजममुंडे यांचे राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे जाणे हे काँग्रेससाठी काहीही नवीन नाही, लोकनेते विलासराव देशमुख आपल्या भाषणांत अनेकदा उल्लेख करीत असत. काँग्रेसच्या प्रदीर्घ प्रवासात अनेक नेते उदयाला आले, काही घडले, काही पुढे गेले; परंतु पक्षाची मुळे कधीच व्यक्तींवर आधारित नव्हती तर ती लोकशाही मूल्यांवर, संघटनशक्तीवर आणि जनचळवळीवर उभी होती. लातूरमध्ये तर काँग्रेस ही केवळ राजकीय संघटना न राहता विकास, सामाजिक ऐक्य आणि लोकांच्या अस्मितेची जपणूक करणारी परंपरा बनली. हाच वारसा देशमुखांनी दिला आणि त्यांची निर्माण केलेली संघटन संरचना कोणत्याही वैयक्तिक आगमनाने किंवा निर्गमनाने हलत नाही, कारण तिची मुळे जिल्ह्याच्या सामूहिक विश्वासात खोलवर रुजलेली आहेत.

लोकनेते विलासराव देशमुख नेहमीच सांगत असत की काँग्रेसचे वर्चस्व हे नेत्यांच्या चमकदार प्रतिमेपेक्षा त्यामागे उभ्या असलेल्या कार्यकर्त्यांच्या ताकदीत आणि संघटनेच्या सक्षम यंत्रणेत आहे. आज त्याच मार्गावर चालत अमित देशमुख काँग्रेसचे लातूरमधील अस्तित्व केवळ टिकवून नाही तर स्थिरपणे बळकट करत आहेत. विरोधकांचा कोलाहल असो, राजकीय आरोप-प्रत्यारोपांची धूळ असो! लातूरमधील काँग्रेसची ओळख आजही देशमुख परंपरेशी घट्ट जोडलेली राहिली आहे. त्यामुळे एखाद्या नेत्याची पक्षातून निर्गमनाची घटना राजकीय चर्चेत रंग भरू शकते, परंतु काँग्रेसच्या मूलभूत प्रभावावर त्याचा परिणाम करणारी ठरू शकत नाही.

लातूरकरांसाठी विकास ही घोषणाबाजी नव्हे, तर विलासरावांनी दिलेला अनुभव. जनतेशी असलेली संवादाची परंपरा, उपलब्धतेची वृत्ती आणि नेतृत्वावरील विश्वास ही मूल्ये आजही देशमुख कुटुंबाने तितक्याच जबाबदारीने जपली आहेत. काँग्रेसच्या उगवत्या दिवसांच्या मागे असलेली मुख्य शक्ती म्हणजे ही सातत्यपूर्ण विचारसरणी आणि लोकाभिमुख काम करण्याची शिस्त. त्यामुळेच जिल्ह्यातील नागरिकांचा आणि कार्यकर्त्यांचा विश्वास आजही काँग्रेसवर कायम आहे आणि लातूर काँग्रेस कोणत्याही व्यक्तिनिष्ठ घडामोडींहून अधिक मजबूत उभी राहते.

अशा पार्श्वभूमीवर, नव्या चेहऱ्यांना संधी देत विकासाच्या दृष्टिकोनातून काम करणाऱ्या अमित देशमुखांच्या कार्यपद्धतीमुळे शहराध्यक्ष किरण जाधव यांनी काँग्रेसकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. याच शक्यतेच्या धास्तीने विक्रांत गोजमगुंडे यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधले, अशी राजकीय चर्चा जिल्ह्यात नोंदवली जात आहे. काही वर्षा पुर्वी वडील दूरावले होते तेंव्हाही काँग्रेसवर फारसा परिणाम झाला नव्हता. ही बाब नजरेआड करून चालणार नाही.

## निलंगा नगरपालिकेसाठी उमेदवार निवडीतच काँग्रेसने मारली बाजी

## निलंग्यात परिवर्तन घडणारच – अभय साळुंके

**निलंगा/आयुब बागवान** : निलंगा नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्षासह प्रभागातील २३ नगरसेवक पदासाठी काँग्रेसकडून सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नाची जाण असणारे सामान्य घरातील उच्चशिक्षित, मितभाषी, अनुभवी व जनसंपर्क असलेले उमेदवार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी आपले राजकीय चातुर्य दाखवित निवडणूकीच्या रिंगणात उतरवले असल्याने उमेदवार निवडीतच काँग्रेसने बाजी घेतल्याचे बोलले जात आहे.

गतवर्षी झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराला मिळालेल्या मताधिक्याच्या आत्मविश्वासावर काँग्रेस पक्ष निलंगा नगरपालिकेच्या निवडणुकीत ताकदीने उतरला आहे. भाजप आणि शिवसेना ठाकरे पक्षासाठीही अत्यंत महत्त्वाची निवडणूक असल्याने त्यांनीही कंबर कसली आहे. काँग्रेसच्यावतीने जिल्हाध्यक्ष अभय साळुंके संपूर्ण यंत्रणा हातात घेऊन जुने आणि नवे असे सर्व काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोट बांधून निवडणूकीची आखणी केली.

सामान्यांच्या प्रश्नाची जाण असणारे व जनसंपर्कातील उमेदवार निवडीसाठी त्यांनी विजयकुमार पाटील, अजित माने, डॉ. अरविंद भातांब्रे, हमीद शेख, अजित नाईकवाडे, आंबादास जाधव, सुधाकर पाटील, लाला पटेल, पंकज



शेळके, विठ्ठल पाटील, ॲड. नारायण सोमवंशी, विलास लोभे आदींची टिम करुन उमेदवारांची निवड केली.

नगराध्यक्ष पदासाठी माजी नगराध्यक्ष म्हणून काम पाहीलेले हमीद शेख यांच्या सारखा अनुभवी, कुलश प्रशासक उमेदवार काँग्रेसला मिळाला. हमीद शेख यांची १५ महिन्याची नगराध्यक्ष म्हणून यशस्वी कारकीर्द अद्यापही नागरिकाच्या लक्षात आहे. शहर स्वच्छता, पहाटे पाच वाजता वार्डा वार्डात फेरफटका, माजी सैनिकांना कर माफी, नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी घेतलेली आमसभा हे विशेष लक्षात राहणारी कामे त्यांनी करुन दाखवली असल्याने जनमानसात त्यांच्याबाबत अपुलकी निर्माण झाली आहे. त्यांच्या सोबत प्रभाग एकमध्ये अनुभवी माजी सभापती म्हणून काम पाहिलेले अजित नाईकवाडे, सुनील नाईकवाडे यांच्या पत्नी सुनिता नाईकवाडे, प्रभाग दोन मध्ये अनुभवी व मुरंबी राजकारणी म्हणून ओळख असलेले अशोकाप्पा शेटकार व सोबतीला गंगूबाई सलघंटे उमेदवार आहेत. सलघंटे व शेटकार यांचा दांडगा जनसंपर्क प्रभागात पाहायला मिळत आहे. प्रभाग तीन मध्ये २१ वर्षीय तरुण उमेदवार भवानीप्रसाद नाईकवाडे मैदानात उतरल्याने तरुणाईत मोठी क्रेज निर्माण झाली आहे. नाईकवाडे परीवाराचे वार्डात मोठे योगदान राहीले आहे. त्यांचे वडील संतोष नाईकवाडे शिक्षक असल्याने त्यांचा जनसंपर्क अधिक आहे. त्यांच्या सोबत धनगर समाजाचे नेते झटींग म्हेत्रे यांच्या सुनबाई संगीता म्हेत्रे उमेदवार आहेत. प्रभाग चार मध्ये ओम शिंदे व अनुसया सावरे प्रभाग पाच मध्ये मागच्या अनेक वर्षांपासून सामान्यांच्या प्रश्नासाठी झटणारे व गतनिवडणूकीत थोडक्यात पराभूत झालेले प्रशांत वांजरवाडे यांच्या मातोश्री व हमीद ईस्माईल शेख, प्रभाग सहा मध्ये दांडगा जनसंपर्क असलेले माजी सभापती सिराज देशमुख व चळवळीतील तरुण कार्यकर्ता तुषार सोमवंशी यांच्या मातोश्री वंदना सोमवंशी, प्रभाग सात मध्ये इस्माईल मनीयार व वकीलीतून जनसेवा करणाऱ्या परीवारातून येणाऱ्या सरोजा भोसले, प्रभाग आठ मध्ये अनुभवी व्यक्तीमत्व तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील यांच्या पत्नी सविता पाटील व चळवळीतील कार्यकर्ते नागनाथ फुलारी, प्रभाग नऊमध्ये माजी नगरसेवक अजगर अन्सारी व गणेश पेठकर यांची पत्नी शिवगंगा पेठकर, प्रभाग दहा मध्ये युवा नेते गिरीश पात्रे व कौशल्या कांबळे, प्रभाग आकरा मध्ये अनुभवी अल्पसंख्यांक नेते इलाही चौधरी सोबतीला राधिका पेठकर व स्वाती सूर्यवंशी उमेदवार आहेत. एकंदरीत काँग्रेस तरुण व अनुभवी उमेदवार मैदानात उतरवल्याने त्यांना फायदा होताना दिसत आहे.

## आईने मोबाइल न दिल्यामुळे अल्पवयीन मुलीची आत्महत्या: रेणापूर तालुक्यातील घटना, मुलगी आयटीआयची विद्यार्थिनी

**रेणापूर/प्रतिनिधी** : आईने मोबाईल दिला नसल्याचा रागमनात धरुन राहत्या घरात सिलींग फॅनला दोरीने गळफास घेऊन मुलीने आत्महत्या केली. आयटीआयची विद्यार्थिनी समिक्षा बाबूराव सोमवंशी ( १७) असे मृत मुलीचे नाव आहे. ही घटना दि. २४ नोव्हेंबर रोजी सोमवारी सायंकाळी ५ वाजता रेणापूर तालुक्यातील कामखेडा येथे घडली.

सोमवारी राहत्या घरात स्वता:चा मोबाईल पाहत अल्पवयीन मुलगी बसली होती. या मुलीच्या हातात मोबाईल असल्यामुळे तिच्या आईने तीच्या हातातून मोबाईल घेतला. त्यामुळे तिने गळफास घेऊन आत्महत्या केली. मोबाइलचा अति वापर मुलांसाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे पालकांनी मुलांचे समुपदेशन करुन मुलांना मोबाइलपासून वळवावे, असे आवाहन मानस शास्त्रतज्ञांनी केले आहे.

या घटनेची माहिती मिळताच रेणापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक नंदलाल चौधरी, जमादार नामदेव सारोळे आणि कर्मचारी अरविंद जोगदंड यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल कारून दुसऱ्या दिवशी अंत्यसंस्कार केले.

वडील शेती आणि किराणा दुकान चालवायचे तर आई घरकाम करुन घरीच असलेल्या किराणा दुकानात मदत करायची. मृत अल्पवयीन मुलगी आणि एक मुलगा दोनच मुले होती. लाडा प्रेमात वाढलेली ही मुलगी केवळ आईने मोबाईल न दिल्यामुळे आत्महत्या केल्याची दुःखद घटना घडल्याने परिवारावर दुः खा चा डोंगर कोसळला आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० % ची मर्यादा ओलांडू नका - SC**

### चिमटा द्याचा



**गुरूच हैवान बनले आहेत !**
**वाईट परिणामाचा संकेत आहे !**
**परिस्थिती आणखीन बिघडण्याची शक्यता आहे !**

## औशाची जनता विकासाबरोबर जाईल - आ. अभिमन्यू पवार

## विरोधकांचे जाती पातीचे राजकारण मतदारांनी धुडकावून लावण्याचे आवाहन

**औसा/प्रतिनिधी** : औसा शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचा निर्धार करत गेल्या सहा वर्षांपासून मी सातत्याने विकास कामे केली आहेत. जात-पात, धर्म या गोष्टी बाजूला ठेवून जनता विकासाबरोबर उभी राहील, असा विश्वास भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनी सोमवारी (दि. २४) प्रभाग दहा मधील महायुतीच्या प्रचार सभेत व्यक्त केला. औसा नगरपालिकेला क वर्गातील राज्यातील आदर्श नगरपालिका बनवायचे असेल तर विकासाचा ध्यास असलेल्या उमेदवारांना संधी देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सभेला सेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने, माजी नगराध्यक्ष किरण उटगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शेखर सोनवणे, शिवरुद्र मुर्गे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पवार म्हणाले की, औसा शहराचा सर्वांगीण व समतोल विकास साधण्यासाठी मी कधीही जात किंवा धर्म पाहून निधी दिला नाही. ज्याला गरज आहे त्या भागाला प्राधान्य देत कामे केली. पण विरोधकांना लोकांसमोर विकास दाखविण्यासारखे काही नाही म्हणून ते जातीयतेचा आधार घेऊन मतदारांची दिशाभूल करत आहेत. नगराध्यक्ष पद ओबीसी महिलेला राखीव असतानाही हे पद घरात ठेवण्याचा राष्ट्रवादीचा प्रयत्न हा ओबीसी समाजाचा अपमानच आहे. गेल्या अनेक वर्षांत पालिकेत भ्रष्टाचार, बोगस कामे आणि निधीचा दुरुपयोग झाला असून आम्ही सुरू केलेल्या विकास कामांना विरोधकांनी छुप्या पद्धतीने अडथळे निर्माण केले.

औसा शहरातील महत्त्वाच्या विकासकामांची माहिती देताना पवारांनी बेलकुंड येथे २४७ हेक्टरवरील एमआयडीसी उभारणी, नवीन बसस्थानक प्रकल्प, माकणी-औसा ५५ कोटींची पाणीपुरवठा योजना, शहरातील सर्व कच्च्या रस्त्यांचे सिमेंट रस्त्यांमध्ये रूपांतर, ४५ कोटींची वाढीव पाणीपुरवठा योजना आणि नवीन पाईपलाइन यांचा उल्लेख केला. शहराच्या सुरक्षेसाठी मुंबईतील मलबार हिलप्रमाणे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून शहरात आधुनिक, पाच मजली उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आले आहे. धार्मिक बांधकामांबाबतही त्यांनी सांगितले की, मुस्लिम समाजातील दर्गे, मशीद व धार्मिक स्थळांच्या विकासासाठी १७ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून हिंदू-मुस्लिम-दलित असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान न्याय देण्यात आला आहे.

बेलकुंड एमआयडीसी व नवीन बसस्थानकाबाबत विरोधकांकडून पसरवल्या जाणाऱ्या अफवा पूर्णपणे



खोट्या असून विकासावर बोलण्यासारखे काही नसल्याने विरोधक अशी दिशाभूल करीत असल्याचा आरोप पवारांनी केला. औशातील मतदारांनी यापूर्वी केलेल्या विकासाची दखल घेत महायुतीला कौल देऊन विकासाच्या पर्वात सहभागी होतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सभेला प्रभाग दहा व अकरातील उमेदवार आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## प्रश्नाची सोडवणुक दूरच..

निवडणुकीचे वारे वाहात असताना व राज्यात महायुतीची सत्ता असताना प्रश्नाची सोडवणुक होते का नाही याचा विचार होत नाही. राज्यात महायुतीची सत्तेत तीन पक्षाचे वर्चस्व आहे. त्यात भाजपाचे मुख्यमंत्री बरोबर शिवसेना एकनाथ शिंदे व राष्ट्रवादीचे अजित पवार हे उपमुख्यमंत्री आहेत. उपमुख्यमंत्री हे सन्मानाचे पद आहे. असे असताना राज्यात शेतकऱ्याचे प्रश्नाची सोडवणुक झालेली नाही. राज्यात महागाई कमी झालेली नाही. जे मुलभूत प्रश्न आहेत ते कायम आहेत. उलट हे नाराज, ते नाराज असे चित्र जनतेला पाहावयास मिळत आहे. राज्यातील अतिवृष्टीने शेतकऱ्यावर संकट आले. खरीप हाताची गेली, आता रब्बी हाती लागेल या आशेवर शेतकरी आहे. राज्यातील बहुतांशींचा व्यवसाय शेती आहे. शेतीच तोट्यात असल्याने ती कशी फायद्यात आणायाची या बाबत विचार होत नाही. शेतकरी तक्रार कर्ता नाही. त्यांची समस्या पाहूनच मदत केली पाहिजे. असे असले तरी शेतकऱ्याबाबत विचार केला जात नाही, कारण शेतकरी सुधारला तर अनेक बाबीचे संकट दूर होणार आहेत. नुकसान भरपाईची मदत आता कोठे मिळत आहे. रब्बीबाबत कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही. त्यामुळे राज्यातील बहुतांशांचा व्यवसाय शेती असताना त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. शेतात अजूनही पाणी आहे. नदीकाठच्या शेतीत ओल असल्याने पीक घेणे आवघड आहे. मुळात शेतीचे जाण असणारा नेता लाभने भाग्याचे ठरते. माजी पंतप्रधान दिवंगत लालबहादुर शास्त्री सारखे शेती व शेतकऱ्यावर प्रेम असणारा नेता सापडणार नाही. मुळात दिशाहीन बाबी दिसून येत आहे. राज्यात शेतकऱ्यांची मुले राज्यकर्ते बनले आहेत. शेतीविषक माहिती असणारेच राज्यात आहेत. ऊस उत्पादक शेतकरी सत्तेत आहेत. अतिषय कमी मंडळींना शेतीची माहिती नसेल. मात्र राज्यात अनेक नेते शेतकरी आहेत हे मान्यच केले पाहिजे. तरी शेतीविषयक प्रेम दिसून येत नाही. बहुतांशी राज्यकर्त्याकडे शेती आहे. ते करतात. अजित पवार असोत किंवा एकनाथ शिंदे हे तसे पाहिले तर शेतकरी आहेत. यापुर्वी अनेक मुख्यमंत्री हे शेतकरी कुटुंबातील होते. उत्तम व प्रगत शेती करणाऱ्याकुटुंबातील मुख्यमंत्री, अनेक मंत्री होते व आहेत. त्यामुळे शेतीची सध्याची आवस्था काय आहे हे तसे सखोल सांगण्याची गरज नाही. मुळात आज ज्यांच्याकडे साखर कारखाने आहेत ते कोण आहेत? त्यामुळे अनेकांना काही बाबी कळतात मात्र यावर मात करण्याचे धाडस दाखवित नाहीत. धाडस तर केले पाहिजे. त्याशिवाय शेतीत प्रगती शक्य नाही. एक तर शेतीमालास योग्य भाव मिळत नाही ही अनेक दिवसाची ओरड आहे. ती योग्य असताना या बाबत निर्णय घेतला जात नाही. ग्रामीण अर्थकरण हे शेतकऱ्यावर आवलंबून आहे हे मान्यच केले पाहिजे. शेती करणे सोडून दिल्यास ग्रामीण भाग ओस पडेल. त्यापेक्षा खाणार काय? हा सर्वात मोठा प्रश्न निर्माण होईल. राज्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यावर अन्याय होता कामा नये. ऊसाचे अनेक उत्पादने होतात मात्र जे दर देतात त्यावेळी ऊसापासून विविध उत्पादने होतात त्याच्या कमाईतीन नफेचा दर दिला जात नाही. त्या सर्व उत्पादनातून मिळणारे आर्थिकबाब मिळून समसमान वाटा ऊस उत्पादक शेतकऱ्यास मिळाला पाहिजे. केवळ साखरवरील उत्पनाचा भाग मिळत असेल तर ते योग्य नाही. सोयाबिनचे तसेच आहे. सोयाबिनपासून तेला बरोबर इतर उत्पादने काढतात. त्यापासून आर्थिक फायदा हा तेल उत्पादक कारखानदारास होतो. तो शेतकऱ्यास मिळत नाही. वास्तविक सर्व बाबीचा समसमान आर्थिक वाटा मिळाला पाहिजे. तरच शेतकरी सुखी व समाधानी राहातील. निवडणका चालू आहेत. यावेळी शेतकऱ्याबाबत कोणी बोलत नाही. विषय निवडणुकीचा आहे. निवडणुकीत उभा राहणारी मंडळी शेतकरी असणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा नावालाच शेतकरी असणारे कृषी बाजार समितीत दिसतात. कधी शेतीत पावुल न ठेवणारी मंडळींना कृषी तज्ज्ञ म्हणत असतील तर ते योग्य नाही. त्यामुळे जी शेतकऱ्याविषयी उणीव दिसून येते याला जबाबदार शेतकरीच समजावयाचे का? मुळात भारतीय शेती ही निसर्गावर आवलंबुन आहे. सत्तरवर्षात शेतीत संशोधन अल्प झाले आहे. प्रगत शेती केली जात नाही. केली तर त्या बाबतीत संकटे अधिक येतात. पुरक शेतीसाठी सांगितले जाते मात्र त्याला मार्केट नसते. उत्पादित मालास जर मार्केटींग असेल तर आर्थिक उत्पनात वाढ होते ही वस्तूस्थिती आहे. भारतामध्ये आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणजे कोंबडी, मासे, शेळीपालन सांगितले जाते. शेती उत्पनावर प्रक्रिया बाबत ज्ञान दिले जात नाही. जसे टमाटे पासून सॉस, फळापासून विविध उत्पादने जी वर्षभर विक्री व्हावीत असे ज्ञान दिले जात नाही. शेळी पालन किंवा कोंबडी पालणे मोठी रिस्क आहे. कधी रोग पडेल व कधी कोंबड्या मरतील ते सांगता येत नाही. त्याच प्रमाणे जोडधंद्यास मार्केट मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता स्वावलंबन स्विकारले पाहिजे. आपल्या शेतीमालास आपणच किंमती ठरवुन थेट ग्राहकापर्यंत विक्री करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शेतकरी जो पर्यंत स्वावलंबी होणार नाही तो पर्यंत दारिद्र्यात जीवन जगावे लागेल. या बाबत शांत डोक्यांनी विचार केला पाहिजे. सत्तरवर्षात केवळ माजी पंतप्रधान दिवंगत लाल बहादुर शास्त्री शिवाय होणीही वाली दिसून येत नाही. केवळ शेतकऱ्यावर वर-वर प्रेम करणारे आहेत. यावर्षी मोठे अतिवृष्टीचे संकट आले. यावर मात करणे किती आवघड जात आहे. त्याच प्रमाणे खरीप पीकाची आशा सोडल्यावर किमान रब्बीचे पीक हाती लागेल. पाण्याचा प्रश्न मिटला आहे. त्यामुळे रब्बीसाठी सरकार व बँकांनी मदत केली पाहिजे. शेतकरी जर एकदा कोलमोडला तर पुन्हा उभारी घेणे आवघड होते. त्यामुळे विचार केला तर एक बाब लक्षात येते आता शेतकऱ्यांनी स्वबळावर स्वावलंबन झाले पाहिजे. सरकारकडून मदत मिळते ती उशीरा मिळते. कामाच्यावेळी सरकारी मदत मिळत नाही ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता पोक्त असा विचार करून वाटचाल केली पाहिजे. काही झाले तरी शेतकऱ्यासारखा राजा कोणी आहे. शेतकरी हा सर्वांना अन्न खाऊ घालतो. शेतकऱ्याकडून पुण्याचे काम होते. त्यामुळे आपणच आपली प्रगती कशी होईल याकडेच आगामी काळात लक्ष देणे योग्य ठरणारे आहे. सध्याला शेतकऱ्याच्या प्रश्नाची सोडवणुक कोणीतरी करेल असे कोणी वाली दिसून येत आहे.

# भारतीय स्त्रीशक्तीचे जगाला विराट दर्शन : उपमुख्यमंत्री अजित पवार

## भारतीय महिला कबड्डी संघाच्या विश्वविजेतेपदाबद्दल उपमुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन



मुंबई, दि. २५ : ढाका येथे झालेल्या महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात चायनीज तैपेइचा ३५-२८ असा पराभव करून भारतीय महिला कबड्डी संघाने विश्वविजेतेपद पटकावले. भारतीय महिला खेळाडूंनी चिकाटी, जिद्द आणि संघभावनेच्या जोरावर जगासमोर भारतीय स्त्रीशक्तीचे विराट सामर्थ्य अधोरेखित केले आहे. हा विजय केवळ क्रीडाक्षेत्रातील पराक्रम नसून देशातील लाखो मुलींना प्रेरणा देणारा ऐतिहासिक क्षण आहे. भारतीय महिलांची विक्रमी कामगिरी नव्या भारताच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारी असून, त्यांच्या खिलाडूवृत्तीसह कठोर परिश्रमाला मी मनापासून सलाम करतो, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी संघाचे अभिनंदन केले.

आपल्या शुभेच्छा संदेशात उपमुख्यमंत्री पवार यांनी म्हटले की, भारतीय महिला कबड्डी संघाने दाखवलेली जिद्द, तंत्र आणि संघभावना प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. संजू देवी आणि उपकर्णधार पुष्पा यांच्या निर्णायक चढायांमुळे अंतिम फेरीत भारताने आघाडी घेत विजयाला गवसणी घातली. प्रशिक्षक तेजस्विनी बाई यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने पुन्हा एकदा जागतिक कबड्डीवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

गेल्या महिनाभरात भारतीय महिलांनी साध्य केलेल्या तीन विश्वविजयांचा विशेष उल्लेख करत उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, देशातील महिला क्रीडा क्षेत्र अभूतपूर्व उंची गाठत आहे. सर्वप्रथम महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून आयसीसी महिला विश्वचषक जिंकला. त्यानंतर भारतीय अंध महिला क्रिकेट संघाने कोलंबोमध्ये झालेला पहिलाच अंध टी-२० विश्वचषक जिंकला आणि आता महिला कबड्डी विश्वचषकातही भारताने विजेतेपद पटकावले. फक्त महिनाभरात भारताच्या मुलींनी मिळवलेल्या या तीन विश्वविजयांनी संपूर्ण देशाची मान उंचावली आहे. भारतीय महिला क्रीडापटूंच्या कामगिरीचा हा सुवर्णकाळ सुरू झाला असून भारतीय महिलांचा विजय रथ कोणी रोखू शकत नाही. देशातील प्रत्येक मुलीसह खेळाडूंसाठी हा प्रेरणादायी क्षण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री पवार यांनी भारतीय महिला कबड्डी संघातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक, सहाय्यक कर्मचारी तसेच खेळाडूंच्या कुटुंबियांचे अभिनंदन केले आहे.

# स्वत:चं घर असताना महिला पंचतारांकित हॉटेल मध्ये राहिली सहा महिने, पोलीस कोठडीत रवानगी

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** आधार कार्डवर खाडाखोड करून गेल्या सहा महिन्यापेक्षा अधिक काळ पंचतारांकित हॉटेलमध्ये राहणाऱ्या संशयास्पद महिलेला पोलिसांनी अटक केलीय. तिच्याकडं विदेशी नागरिकांचे काही मोबाईल क्रमांक आढळून आले आहेत. काही पासपोर्ट आणि व्हिसाचे फोटोही तिच्याकडं आढळून आल्याची माहिती समोर आलीय. स्वत:चे घर असताना देखील ती हॉटेलमध्ये राहत होती. तिच्याकडं अनेक नेत्यांचे 'एआय'द्वारे बदल केलेले फोटो आढळून आलेत. महिलेला न्यायालयात हजर केलं असता २६ नोहेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती सिडको पोलिसांकडून देण्यात आली.

सनदी अधिकारी म्हणून ती वावरत होती? : संबंधित महिला शहरातील पाडेगाव येथे वास्तव्यास आहे. तिचे वडील जिल्हापरिषद शाळेत शिक्षक म्हणून होते. त्यांच्या निधनानंतर ती आईबरोबर पाडेगाव भागात राहत होती. मात्र, गेल्या सहा महिन्यापासून ती पंचतारांकित हॉटेलमध्ये राहत होती. सनदी अधिकारी म्हणून ती वावरत होती. तिच्या बँक खात्यावर देश, विदेशातून काही रक्कम जमा झाली होती, अशीही माहिती समोर आलीय. मात्र, यावर पोलिसांनी अधिकृत भाष्य केलंलं नाहीय.

विद्यापीठात होती नोकरीला : संबंधित महिला २०१३ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ज्युनियर असिस्टंट म्हणून नोकरीला लागली होती. मात्र, २०१९ मध्ये अचानक सहा महिने अर्ज न करताच कामावर न आल्याने तिला नोटीस देण्यात आली होती. त्यावर समाधानकारक उत्तर सादर न केल्यानं तिला कामावरून कमी करण्यात आलं होतं, त्याविरोधात खंडपीठात देखील धाव घेतली होती, अशी माहिती विद्यापीठातून देण्यात आली होती. २०२१ मध्ये राष्ट्रवादी - शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांच्या ताफ्यात गाडी घुसवण्याचा प्रयत्न केल्यानं तिला ताब्यात घेतलं होतं. मात्र, चौकशीनंतर तिला सोडण्यात आलं होतं.

# मुख औषधशास्त्र व क्ष- किरण शास्त्रातील राष्ट्रीय चरक पुरस्कार डॉ. अभय कुलकर्णी यांना प्रदान

## चिलीचे कॉन्सुल जनरल गुस्तोवो गोंझालेझ यांच्या हस्ते डॉ. कुलकर्णी यांना पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत चिकित्सा शास्त्रातील उत्कृष्ट कार्यासाठी दिला जाणारा ''राष्ट्रीय चरक पुरस्कार (शाखा: मुख औषधशास्त्र व क्ष किरण शास्त्र)'' येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख औषधशास्त्र व क्ष किरण शास्त्र विभागातील सहयोगी प्रा. डॉ. अभय कुलकर्णी यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत शाखेतील वेगवेगळ्या विषयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दंत रोग तज्ज्ञांना राष्ट्रीय चरक पुरस्कार दिला जातो. सन २०२५ मधील या पुरस्कारासाठी देशभरातून नामांकन अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये मुख औषधशास्त्र व क्ष किरण शास्त्र शाखेत डॉ. अभय कुलकर्णी यांनी केलेली रुग्ण सेवा, संशोधन, विविध पुस्तकांचे लेखन, कॉपी राईट व तंबाखु नियंत्रणासाठी केलेले भरीव कार्य लक्षात घेवून सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार त्यांना जाहिर झाला. मुंबई येथील जिओ कन्वेन्शन सेंटर येथे दि. ८ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या सोहळ्यात चिलीचे कॉन्सुल जनरल श्री गुस्तोवो गोंझालेझ यांच्या हस्ते हा पुरस्कार डॉ. अभय कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्य सचिव डॉ. अशोक ढोबळे, प्रभारी डॉ. दिपक माखीजानी हे उपस्थित होते.



डॉ. अभय कुलकर्णी हे गेल्या १२ वर्षापासून दंत शाखेतील मुख औषधशास्त्र व क्ष किरण शास्त्र या विषयात कार्यरत आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने दिला जाणा 'अविष्कार २३' हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. त्यांची दंत आरोग्य विषयात सहा पुस्तके प्रसिध्द आहेत. दंत आरोग्य जागृतीसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड या भाषेत ही पुस्तके प्रकाशीत केली आहेत. त्यांचे राज्यस्तरीय २०, राष्ट्रीय ६, आंतरराष्ट्रीय ३ नियतकालीकात शोधनिबंध प्रसिद्ध असून १७ कॉपीराईट आहेत. नाविन्यपूर्ण उपकरणे व संशोधनासाठी ते नेहमी प्रयत्नशील असून तंबाखु विरोधी मोहिमेसाठी सुध्दा ते सातत्याने कार्यरत आहेत.

या यशाबद्दल डॉ. अभय कुलकर्णी यांचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. प्रियंका लासुणे, डॉ. रोहिणी दिवेकर, डॉ. सायोज्यता बांगर यांच्यासह महाविद्यालयातील विविध विभागाचे प्रमुख शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचा बाभळगाव निवासस्थानी नागरिकांशी संवाद; समस्या निवारणासाठी अधिकाऱ्यांना सूचना



**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर आणि जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांच्या भेटी घेतल्या.

यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार केला. तसेच, संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी त्वरित सूचना केल्या.

या भेटीदरम्यान रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) च्या लातूर महिला जिल्हाध्यक्ष जयश्रीताई उटगे, औसा शहर काँग्रेसचे अध्यक्ष अजहर हाश्मी, डॉ. वहीद कुरेशी, गोविंद देशमुख, प्रा. सुधीर अनवले, व्यंकटेश पुरी, विलास भोसले, एन.आर. पाटील, बापू चव्हाण, पप्पू देशमुख, तानाजी फुटाणे, गणेश यादव, धनंजय यादव, प्रमोद मुंदडा, विकास कांबळे, दत्ता सोमवंशी, ॲड. विजय गायकवाड, आयुब मणियार नागसेन कामेगावकर, सचिन कराळे, मिलिंद घणघावे, हुसेन शेख, सायरा पठाण, किरण बनसोडे, शोभा पाटील, रणधीर सुरवसे, सुनील संमुखराव, इमरान गोंद्रीकर, सालार शेख, रमेश पाटील, युवराज जाधव, अराफ़त खान, जयचंद भिसे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# संविधान दिनानिमित्त 'दिलखुलास' कार्यक्रमात प्रा. विजय मोहिते यांची विशेष मुलाखत




**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमाच्या 'संविधान दिन' विशेष भागांतर्गत सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई येथील संविधान व इतिहास विषयाचे अभ्यासक प्रा. विजय मोहिते यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.बुधवार दि. २६. गुरूवार दि. २७ आणि शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ असे तीन दिवस सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच 'News on AIR' या मोबाईल ॲपवर ही मुलाखत प्रसारित होईल. निवेदक शिबानी जोशी यांनी ही मुलाखत घेतली आहे.'भारताचे संविधान' हा आपल्या देशाचा सर्वोच्च व मार्गदर्शक कायदा असून राष्ट्राची शासनव्यवस्था, राजकीय रचना, शासनसंस्थांचे अधिकार-कर्तव्ये, तसेच नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये यांची स्पष्ट चौकट ते निर्धारित करते. जगातील सर्वात मोठे लिखित संविधान म्हणून भारतीय संविधानाची विशेष ओळख आहे. या कार्यक्रमात प्रा. मोहिते यांनी संविधान निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भारतीय संविधानाचा प्रवास, लोकशाही मूल्यांची अंमलबजावणी व आजच्या पिढीसमोरील आव्हाने, नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये, तसेच आधुनिक समाजातील संविधानाची उपयुक्तता अशा महत्त्वपूर्ण मुद्यांवर मार्गदर्शन केले आहे.

# कार्यक्रमावरुन परत येताना घडला अनर्थ, एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी अंत

**वर्धा /प्रतिनिधी :** वर्ध्याच्या सेलू-काटे इथल्या कुटुंबावर काळाने झडप घातल्याची हृदय पिळवटून टाकणारी दुर्घटना रात्रीच्या सुमारास घडली. चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील सेलुकाटे येथील रहिवासी पती-पत्नी आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. अपघातात आणखी एक मुलगा गंभीर जखमी असून त्याच्यावर सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सेलूकाटे इथल्या नवोदय विद्यालयाजवळ रात्रीच्या सुमारास घडली.पती सोमनाथ भोयर (३८), पत्नी निकीता सोमनाथ भोयर (३२) आणि मुलगा पुरब सोमनाथ भोयर (६) असं मृत पावलेल्या तिघांची नावं आहेत. तर तिघेही गणेशनगर इथं एका कार्यक्रमासाठी गेले होते. भोयर कुटुंब गणेशनगर येथून कार्यक्रम आटोपून दुचाकीवरून आपल्या घरी परतत असताना भरधाव चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडक इतकी भयंकर होती की तिन्ही जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर एक मुलगा गंभीर जखमी झाला. धडक झाल्यानंतर वाहन चालकाने जागेवरून पळ काढल्याची प्राथमिक माहिती आहे. चारचाकी वाहन वायगाव इथले आहे. घटनास्थळी तातडीने नागरिकांनी धाव घेत जखमी मुलाला त्वरित सावंगी येथील रुग्णालयात हलविले. डॉक्टरांनी त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले आहे. अपघातानंतर परिसरात शोककळा पसरली असून अचानक झालेल्या या अपघातात संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून फरार वाहनचालकाच्या शोधासाठी तपास सुरू केला आहे. ग्रामीण भागात वाढत्या वाहतूक आणि बेदरकार वाहनचालकांमुळे असे अपघात वाढत असल्याची नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या अपघातामुळे संपूर्ण परिसर शोकाकुल झाला असून मित्र परिवाराकडून मृतांना श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

# सकाळी बीटरूट ज्यूस प्यायल्याने फायदे जाणून घ्या

जर तुम्ही दररोज सकाळी बीटरूट ज्यूस पित नसाल तर त्याचे फायदे जाणून घेतल्यावर तुम्हीपण पिण्यास सुरुवात कराल.

बीटरूट ज्यूस आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानला जातो. दररोज सकाळी तो प्यायल्याने तुम्हाला कदाचित कल्पनाही नसेल असे आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. बीटरूट ज्यूसमध्ये लोह, फायबर, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. ते नियमितपणे प्यायल्याने तुमचे रक्त शुद्ध होतेच, शिवाय इतरही अनेक महत्त्वाचे फायदे मिळतात. या लेखात, तुम्ही दररोज सकाळी बीटरूट ज्यूस पिण्यास सुरुवात करता तेव्हा हे आरोग्यदायी फायदे मिळतात. चला तर मग जाणून घेऊ या.

**रक्तदाब कमी करते**

जेव्हा तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी बीटचा रस पिता तेव्हा ते तुमच्या शरीरात नायट्रिक ॲसिड तयार करते. याचा अतिरिक्त फायदा म्हणजे तुमच्या रक्तवाहिन्या रुंद होतात, ज्यामुळे रक्तदाब कमी होतो.

जर तुम्हाला उच्च रक्तदाबाचा त्रास असेल तर तुम्ही दररोज सकाळी हा रस नक्कीच प्यावा.

**शरीरात रक्त तयार होते.**

बीटरूटच्या रसात फॉलिक ॲसिड, लोह आणि व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. ते नियमितपणे प्यायल्याने तुमच्या शरीरात नवीन रक्त तयार होण्यास मदत होते.

**स्नायूंना ऑक्सिजन पोहोचवते**

जर तुम्ही खेळाडू असाल तर बीटरूटचा रस खूप फायदेशीर आहे. बीटरूटच्या रसातील नायट्रेट्स तुमच्या स्नायूंमध्ये ऑक्सिजन पोहोचवण्यास मदत करतात.

**यकृत डिटॉक्समध्ये उपयुक्त**

बीटरूटच्या रसामध्ये बीटालाइन नावाचे रंगद्रव्य असते, जे तुमच्या यकृतासाठी अत्यंत फायदेशीर असते. बीटरूटचा रस नियमितपणे पिल्याने तुमचे यकृत देखील विषमुक्त होऊ शकते.



# हिवाळ्यात लहान मुलांची काळजी कशी घ्यावी

मुलांची हिवाळ्यातील काळजी: हिवाळा ऋतू लहान मुलांसाठी, विशेषतः नवजात मुलांसाठी अनेक आव्हाने घेऊन येतो. या मुलांची रोगप्रतिकारक शक्ती पूर्णपणे विकसित झालेली नसते, ज्यामुळे त्यांना सर्दी, फ्लू आणि न्यूमोनिया सारख्या हंगामी आजारांना बळी पडण्याची शक्यता जास्त असते. तापमान कमी होताच, हवा कोरडी होते, ज्यामुळे त्यांची नाजूक त्वचा आणि श्वसनसंस्थेवर परिणाम होतो.

हिवाळ्यात आरोग्याची काळजी घेण्यासाठी या ५ गोष्टी खा

या काळात बाळाला योग्यरित्या कसे उबदार ठेवावे, स्वच्छता कशी राखावी आणि त्याच्या पौष्टिक गरजा कशा पूर्ण कराव्यात हे पालकांना माहित असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लहान मुलांना फक्त उबदार कपडेच आवश्यक नाहीत तर पुरेसे हायड्रेशन, निरोगी आहार आणि संसर्ग टाळण्यासाठी विशेष संरक्षण देखील आवश्यक आहे. योग्य माहिती आणि योग्य काळजी घेतल्यास, तुम्ही तुमच्या मुलाला या सुंदर ऋतूचा आनंद निरोगी आणि सुरक्षितपणे घेता येईल याची खात्री करू शकता. हिवाळ्यात स्वतःला निरोगी ठेवण्यासाठी दररोज आवळा खावे, इतर फायदे जाणून घ्या

योग्य कपडे आणि उबदारपणा

* थर घालणे: तुमच्या मुलाला नेहमी एकाच जाड कपड्यांऐवजी अनेक पातळ थर घाला. हे हवा अडकवते आणि चांगली उष्णता प्रदान करते. आतील थर सूतीअसावा.

डोके, हात आणि पाय: तुमच्या बाळाच्या डोक्यातून संपूर्ण शरीरापेक्षा जास्त उष्णता कमी होते. म्हणून, टोपी, हातमोजे आणि उबदार मोजे घालण्याची खात्री करा, विशेषतः जेव्हा ते बाहेर असतील.

* घरातील तापमान: खोलीचे तापमान खूप गरम किंवा खूप थंड नसावे. हीटर वापरताना आर्द्रता राखण्यासाठी



खोलीत पाण्याचा एक भांडे ठेवा किंवा ह्युमिडिफायर वापरा.* झोपताना: तुमच्या बाळाला जड ब्लँकेटने झाकू नका, कारण यामुळे बाळाला गुदमरण्याची शक्यता असते. स्लीपिंग बॅग किंवा हलके ब्लँकेट वापरा.

२. रोग प्रतिकारशक्ती आणि पोषण

* स्तनपान: बाळांसाठी, आईचे दूध अत्यंत महत्वाचे आहे. ते त्यांना संसर्गाशी लढण्यास मदत करणारे अँटीबॉडीज प्रदान करते.

* उबदार अन्न: जर बाळ घन पदार्थ घेत असेल तर त्याला गरम सूप, मसूर पाणी आणि ताज्या हंगामी भाज्या आणि फळे द्या.

# मोटार अपघातात नुकसान भरपाई कशी मिळते?

मोटारीने समजा एखाद्या व्यक्तीला धडक दिली व ती व्यक्ती मरण पावली अथवा ती गंभीर जखमी झाली अथवा तिला अपंगत्व आले तर, मोटार अपघात कायद्यानुसार सबंधित व्यक्ती मृत झाल्यास त्या व्यक्तीच्या वारसांना वकिलामार्फत जवळच्या न्यायालयात नुकसान भरपाईचा दावा करता येतो. त्यानुसार सबंधित गाडीचा थर्ड पार्टी विमा ज्या कंपनीकडे उतरवला असेल त्या कंपनीविरुद्ध व चालक, मालक यांच्या विरुद्ध दावा दाखल करून नुकसान भरपाई मिळवता येते.

बर्याचदा नागरिकांचा असा समज असतो की, जर त्या वाहनाचा विमा नसेल तर, नुकसान भरपाई मिळत नाही; पण असे नसते सबंधित वाहन मालकाकडून नुकसान भरपाई मिळवता येते. कधी-कधी असाही गैरसमज असतो की अपघातामध्ये मरण पावलेल्या व्यक्तीकडे वाहन चालवण्याचा परवाना नसल्यास कशी भरपाई मिळणार? तर तुम्हाला तरी सुद्धा भरपाई मिळू शकते. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या विविध खटल्यात तांत्रिक कारणामुळे विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करू शकत नाही, असे स्पष्ट करणेत आले आहे. मात्र, विमा कंपनीच्या काही अटी तुम्ही पाळल्या नसतील तर, निष्काळजीमुळे मिळणारी नुकसानभरपाई कमी होऊ शकते. नुकसानभरपाई ही मृत व्यक्ती किती उत्पन्न मिळवत होती व तिच्यावर कितीजण अवलंबून आहेत व त्याचे वय किती होते, या बाबीवर प्रामुख्याने अवलंबून असते. अगदी भविष्यातील नुकसान देखील मृत व्यक्तीच्या वारसांना मिळत असते. एखाद्या वाहन चाककाचा अपघात झाला असेल, तरी देखील त्या व्यक्तीच्या वारसांना नुकसानभरपाई मिळू शकते.

ई-चलनसाठी वाहनांचे वैयक्तिक फोन वरून फोटो काढल्यास पोलिसांवर कारवाई

बरेचदा वाहतूक नियमांचे उल्लंघन होताना पोलिस कर्मचारी स्वतःच्या वैयक्तिक फोन द्वारे फोटो घेऊन आपल्या वेळेनुसार ई-चलन प्रणालीत अपलोड करतात त्यावर निर्बंध घालण्यासाठी अप्पर पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य प्रवीण साळुंखे यांनी एक विशेष आदेश दिनांक ३ जुलै २०२५ रोजी जारी केला असून, जर खाजगी फोन ने फोटो काढून ते अपलोड केले गेले, तर सबंधित पोलीस अधिकारी वर्गावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे त्यात स्पष्ट केले आहे. त्यामुळे ई-चलन मशीन ज्यामध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन केलेल्या गाडीचा फोटो त्यावर तारीख व वेळ स्पष्ट दिसेल, अशा उपकरणाद्वारेच फोटो काढण्यास परवानगी दिली आहे. तुमच्याकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन झाले असल्यास तुम्ही आलेला दंड ऑनलाइन भरू शकता किंवा परिवहन विभागात जाऊन भरू शकता. दंडासाठी तुम्हाल पोलीस स्टेशनला जाण्याची गरज नसते. बरेचदा, लोकन्यायालयात या दंडाची रक्कम भरता येते. त्यासाठी परिवहन विभाग त्यांच्या उपकरणासह हजर असतात.

मोटार अपघात कायदा २०२३ च्या तरतुदीनुसार परवाना नसताना मुलाना गाड्या दिल्यास व वाहतूक पोलिसांच्या निदर्शनास आल्यास वाहनमालक आई वडिलाना देखील शिक्षा, दंड होऊ शकतो...



## तुम्हाला हे माहीत आहे का?

डिजिटल अरेस्ट ची तरतूद कायद्यात नाही..

सध्या नोकरीनिमित्त मुले बाहेरगावी राहतात त्याचा गैरफायदा घेत काहीजण समाज माध्यमावर असलेले तुमचे फोटो व पत्ते वापरून तुमच्या घरी फोन करून तुमचा मुलगा आमच्याकडे अटक आहे त्याला सोडवायचे असेल तर अमुक इतकी रक्कम द्या.. अशी मागणी होते.. नकली गणवेशात अधिकारी तुम्हाला व्हिडीओ कॉल देखील करतात. सगळे फसवणुकीचा प्रकार असून, अशा प्रकारची अटक आपल्या कायद्यातच नाही. त्यामुळे सर्वांनी काळजी घेत कुणाच्या ही अनोळखी फोनला प्रतिसाद देऊन घाबरून जाऊ नये. बर्याचदा, ऑनलाइन वस्तू मागविल्यावर त्याचे बॉक्स व विविध पॅकिंग लोक फेकून देतात त्यावर असलेला पत्ता मोबाईल क्रमांक सर्व तसेच राहते त्याचा दुरुपयोग करून असे सायबर क्राईम घडतात.

सायबर क्राईम साठी कुठे तक्रार नोंदवता येईल.

माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत सायबर गुन्ह्यासाठी सात वर्षापर्यंत तुरुंगवास व पाच लाखापर्यंत दंडाची शिक्षा जर कोणताही सायबर गुन्हा आपले बाबत घडल्यास आपण १९३० या राष्ट्रीय टोल फ्री क्रमांकावर फोन करून माहिती देऊ शकता. याशिवाय जवळच्या पोलिस स्टेशनशी आपण संपर्क करू शकता,. लूलशीलीळाश.सीं.ळप वर (सायबर क्राईम डॉट गव्हर्मेंट डॉट इन) तक्रार दाखल करू शकता. २४ तास ही सेवा चालू असते. तुमच्या खात्यातून चुकून पैसे गेले तर, त्वरित बँकेला देखील तुम्ही कळवू शकता. तुमच्या सर्व दखलपात्र तक्रारीची दखल पोलिस स्टेशनला घेतली जाईल.

तुमचे बँक के वाय सी (नो यूवर क्लायंट) करावयाचे आहे आधार क्रमांक द्या.. ओटीपी सांगा, असे फोन वरून सांगून तुमचे खाते रिकामे केले जाऊ शकते. त्यासाठी के वाय सी प्रत्यक्ष बँकेत जाऊन पूर्ण करा. याशिवाय, ऑनलाइन माहिती घेतल्यास प्रत्येक विभागात सायबर सेल स्थापन करण्यात आले आहे.

पोलीस मदतीसाठी तुम्ही १०० क्रमांकाच्या टोल फ्री नंबर वर कॉल करू शकता. तर ११२ क्रमांकावर कॉल केल्यास तुम्हाला अँब्युलन्स, अग्निशमन सेवा व पोलिस या सर्व बाबतीत मदत होऊ शकते.

अडचणीतील महिलांना मदतीसाठी १०९० हा टोल फ्री क्रमांक असून यावर फोन करून तुमच्या संकटाची माहिती देताच तुम्हाला मदतीची प्रक्रिया सुरू केली जाते.

राष्ट्रीय अथवा राज्य महामार्ग मदत कक्ष

तुम्हाला राष्ट्रीय महामार्गावर मदत हवी असेल, तर तुम्ही १०३३ या क्रमांकावर टोल फ्री मध्ये फोन करून मदत मिळवू शकता. बरेचदा आपल्याला टोल त्या टोलच्या पावतीमागे अत्यावश्यक वेळी मदतीचे क्रमांक दिलेले असतात ते न पाहिल्याने आपल्याला मदत मिळवण्यास अडचण येते. खरे तर, टोलच्या रकमेत या सेवेच्या रकमेचे देखील पैसे जमा असतात. परंतु, माहिती अभावी अनेकदा लोक या सेवेपासून वंचित राहतात.

ट्रॅक्टर व ट्रेलर मधून पडल्यास अपघात नुकसान भरपाई कशी मिळवता येते.

सध्या साखर कारखान्याचा गाळप हंगाम चालू आहे. बरेचदा असा समज असतो की एखादी व्यक्ती ट्रेलर मधून पडली व तिचा मृत्यू झाला अथवा ती जखमी झाली व त्या ट्रेलरचा विमाच नसेल तर अशा परिस्थितीत संबंधित ट्रेलरला जोडलेला ट्रॅक्टर व ट्रेलर मालक या दोघांवर त्याची जबाबदारी जाते. मग ट्रॅक्टर ची विमा कंपनी व ट्रेलर मालक या दोघांना मिळून सबंधित व्यक्तीला नुकसान भरपाई द्यावी लागेल, असा निकाल नुकताच एका खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

पत्नीच्या अपघातात पतीला देखील नुकसान भरपाई मिळते

आपण बरेचदा असे ऐकतो की, पतीचा अपघाती मृत्यू झाल्याने त्याच्या वारसांना पत्नीला नुकसान भरपाई मिळाली; मात्र, पत्नीचा अपघात झाला असेल व तिचा मृत्यू झाला असेल, तर पती देखील मुलाबरोबर नुकसान भरपाईस पात्र ठरतो याबाबत देखील सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक निकाल दिला आहे...

-----------------------

**ॲड. जी. एम. आळंदीकर, बारामती**
**(मो. ९४२३०२०२५५)**

## वैवाहिक जीवनासाठी काही टिप्स



अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे पुरूष आणि स्त्री या कालांतराने ही समस्या गंभीर होऊन त्यामुळे वंधत्वाची तक्रार पुढे येऊ शकते. त्यामुळे अल्कोहोलपासून दूर राहणंच योग्य राहील असं म्हटलं जातं.

**लैंगिक ताठरतेमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या कसे रोखाल?**

संशोधनानुसार, लैंगिक ताठरतेच्या समस्या रोखण्यासाठी फ्लॅव्होनाईट्स सेवन करणं आवश्यक आहे. अभ्यासानुसार ब्ल्यूबेरीमध्ये आढळणारं ॲन्थोसायनिन हे एक प्रकारचं फ्लॅव्होनाईड आहे.तसंच इतर लिंबूवर्गीय फळांमध्ये ते आढळून येतं. फळांच्या सेवनामुळे लैंगिक समस्येत १४ टक्क्यांपर्यंत सुधारणा होऊ शकते. फ्लॅव्होनाईडयुक्त आहाराचे सेवन तसेच व्यायाम यांच्या मदतीने ही समस्या २१ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. त्यामुळे आपल्या आहारात फळांचा अधिक समावेश करायला हवा.काही संशोधकांच्या मते, भूमध्य समुद्राच्या आसपास राहणाऱ्या लोकांच्या पद्धतीनुसार आहार घेतल्यास त्याचा फायदा होऊ शकतो. **(क्रमशः)**

## विनोद




शिक्षक विद्यार्थ्यांना विचारतात, मला सांग, आई श्रेष्ठ की शिक्षक?

शिक्षक !

कारण आई एका वेळेस एकाच मुलाला झोपवते तर शिक्षक नीरस शिकवताना सर्व वर्गाला झोपवतात.

## संदेश

" 4 U "

Aesi Hawa Chali K Hum
BARBAD Ho Gaye..
Gaur Farmaye Ga..
Aesi Hawa Chali K Hum
Barbad Ho Gaye..
Kal K Tum Ladke Aaj
Badmash Ho Gaye.

## सुविचार




स्कृतज्ञ असावे पण कृतघ्न नसावे.

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: ।**
**दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।**

**अर्थ :** दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. जबरदस्तीची हप्तावसुली
४. उगीच
७. खाळगी, मोठे भोक
९.श्वास, धमकी
१०. अधिक महिना
११. नंतर
१२. शिल्लक राहिलेला कचरा
१३. दया करणारा (परमेश्वर)
१४. जीभ
१५. हत्तीसारख्या डौलदार चालीची
१७. त्रस्त
१९. हळूच
२१. गर्दीची धावाधाव
२३. सूट
२४. हेकट
२५. द्रव्य
२६. अभिनेता
२७. नस्काराचा एक शब्द
३०. पांढरपेशा, नोकरदार
३३. संताप, क्रोध
३४. डोक्यावर दहाचा आकडा मिरवणारा
३५. अंधार
३६. बर्फ
३८. पळसाचा डिंक
३९. महाभारतकाळापासून प्रसिद्ध बर्फाळ पर्वतराजी
४१. देवाण-घेवाण
४३. अरण्य
४५. चांदी
४७. मच्छर, चिलट
५०. भान, समज
५१. नाकारणे
५३. नमनीय
५६. गवगवा
५८. गरजू
६०. रथावर बसलेला
६१. हुक्की, लहर
६२. गर्दीचा विळखा
६३. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस
६४. हिंदीत सरसरीत मिश्रण
६५. दया
६८. डोळे असणारे फळ
७०. दरवळ
७३. कमी केलेला
७४. उत्तराधिकारी
७५. उमाळा
७६. उडाणटप्पू

### उभे शब्द

१. संरक्षणासाठी खोदलेला चर
२. शंकराजवळचे छोटे चर्मवाद्य
३. कपड्याला लावलेली चुणीदार पट्टी
४. विसराळू
५. इच्छा
६. उबदार पांघरुण (इंग्रेजी)
७. बारीक खड्डा
८. विद्युल्लता
१०. मध
१२. हलव्याचा कंद
१५. गणपतीचे एक नाव
१६. हिंदीत भेसळ
१८. नातेवाईक
१९. अपहार, पैशाचा घोटाळा
२०. मोगऱ्याची माळ
२१. निष्णात
२२. वेतन
२३. घोंगड्या विणणारी जमात
२५. मालक
२८. माझे
२९. थोरवी
३१. खण
३२. माणूस
३३. कौसल्यापुत्र
३४. घाणेरडे पाणी
३७. जखमेवरील स्निग्ध औषध
३८. मिठी
३९. फायदेशीर, कल्याणकारी
४०. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (नाव)
४२. शेंडीभोवती राखलेले केस
४४. एक लहान गड्डाभाजी
४६. आपले राष्ट्रगीत
४८. रेशमी धोतर
४९. शिक्षा
५०. जाण्याची आज्ञा, मात्र हिंदी गाण्यात असल्यास लाडिकपणे होणारी
५२. मातीचा कण
५४. पाणी
५५. योग्य, समर्पक
५६. ओझे वाहणारे जनावर
५७. उन्हाळ्यात केले जाणारे साठवणीचे पदार्थ
५९. यंत्रातील घर्षण कमी करणारे तेल
६४. चिक्कूसाठी प्रसिद्ध गाव
६५. वाळवी
६६. मेख, रहस्य, मर्म
६७. पत्नी
६८. शेवट, अखेर
६९. नूतन
७०. राहण्याची जागा
७१. झीज, मडके
७२. रोखलेली नजर
७४. जागृत, ठिकाण

### आडवे उत्तर

१.खंडणी ४.विनाकारण ७.खबदाड ९.दम १०.मलमास ११.मग १२.गाळ १३.करुणाकर १४.रसना १५.गजगामिनी १७.बेजार १९.अलगद २१.पळापळ २३.सवलत २४.हट्टी २५.धन २६.नट २७.रामराम ३०.चाकरमानी ३३.राग ३४.नाग ३५.तम ३६.हिम ३८.कमरकस ३९.हिमालय ४१.देवघेव ४३.वन ४५.रजत ४७.मशक ५०.जाणीव ५१.नकार ५३.वंदनीय ५६.गाजावाजा ५८.गरजवंत ६०.रथारूढ ६१.सणक ६२.गराडा ६३.वळीव ६४.घोल ६५.अननस ६८. अननस ७०.घमघमाट ७३.वजा ७४.वारसदार ७५.कढ ७६.उंडगा

### उभे उत्तर

१.खंदक २.डमरु ३.झालर ४.विसरभोळा ५.कामना ६.राग ७.खळगा ८.दामिनी १०.मकरंद १२.गाजर १५.गजानन १६.मिलावट १८.नातलाग १९.अफरातफर २०.गजरा २१.पट्टीचा २२.पगार २३.सनगर २५.धनी २८.मम २९.महिमा ३१.कप्पा ३२.मानव ३३.राम ३४.नासवणी ३७.मलम ३८.कव ३९.हितकारक ४०.यशवंतराव ४२.घेरा ४४.नवलकोल ४६.जनगणमन ४८.कद ४९.सजा ५०.राजा ५२.रज ५४.नीर ५५.यथार्थ ५६.गाढव ५७.वाळवण ५९.वंगण ६४.घोलवड ६५.कसर ६६.गोम ६७.भामा ६८.अस्त ६९.नवा ७०.घर ७१.घट ७२.टक ७४.जागा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### यशस्वी,राहुल सलामी जोडी माघारी, टीम इंडियावर पराभवाची टांगती तलवार



आसाम-गुवाहाटीच्या बारसपारा स्टेडियवर टीम इंडियाची अवस्था बिकट झाली आहे.कारण साऊथ आफ्रिकेने दिलेल्या ५४९ दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाची सूरूवात खराब झाली आहे.कारण टीम इंत्रिडयीचे सलामीवर स्वस्तात बाद झाले आहेत. त्यामुळे टीम इंडियासमोर परावभवाचं सावटं आहे. चौथ्या दिवसअखेर टीम इंडियाचा डाव २७ वर २ विकेट गमावून खेळतो आहे. आता टीम इंडियासमोर अजून ५२२ धावांचे आव्हान आहे. तर साऊथ आफ्रिकेला जिंकण्यासाठी ८ विकेटची आवश्यकता आहे.खरं तर साऊथ आफ्रिकेने नुकताच आपला दुसरा डाव ५ विकेट गमावून २६० धावांवर घोषित केला होता. तर पहिल्या डावातील २८८ धावांची आघाडी या बळावर साऊथ आफ्रिकेने टीम इंडियासमोर ५४८ धावांची आघाडी घेतली होती.त्यामुळे टीम इंडियासमोर ५४९ धावांचे लक्ष्य आहे. चौथ्या दिवसाच्या खेळ संपायलवा अवघा एक तास उरला असताना साऊथ आफ्रिकेने आपवा डाव घोषित केला होता.त्यामुळे मिळून जूळून टीम इंडियाला आज फक्त १८ ओव्हरच फलंदाजी करायची होती.त्यामुळे टीम इंडियाची यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल ही सलामी जोडी इतक्या ओव्हरचा आरामात सामना करून एकही विकेट गमावणार अशी अपेक्षा होती.

### एशियन पेंट्स बनली भारतीय क्रिकेट संघाची मऑफिशियल कलर पार्टनर

मुंबई-भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळाने मंगळवारी मोठी घोषणा केली. भारताची आघाडीची पेंट कंपनी एशियन पेंट्स पुढील तीन वर्षासाठी भारतीय क्रिकेट संघाची मऑफिशियल कलर पार्टनरफ झाली आहे. या करारांतर्गत भारतात होणाऱ्या पुरुष आणि महिला संघांच्या ११० हून अधिक आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एशियन पेंट्सला ब्रँडिंगचे अधिकार मिळणार आहेत. मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत बीसीसीआय सचिव जय शाह यांचे प्रतिनिधी देवाजित साकीया आणि एशियन पेंट्सचे एमडी, सीईओ अमित सिंगले यांनी या भागीदारीची औपचारिक घोषणा केली.

जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट मंडळ असलेल्या बीसी-सीआय च्या प्रायोजकांच्या यादीत आता एशियन पेंट्सचा समावेश झाला आहे. यापूर्वी डूर्क्षीफि, ऊशरा११, ढरींर (टाटा सन्स), उरारि, औंलशीस, डइख ड्ळषश अशा दिग्गज कंपन्या भारतीय क्रिकेटशी जोडल्या गेल्या आहेत. नुकताच अपोलो टायर्ससोबत जर्सी स्पॉन्सरशिपचा करार झाला, त्यानंतर लगेच एशियन पेंट्सचा हा करार बीसी-सीआय च्या खजान्यात कोट्यवधी रुपयांची भर घालणार आहे. सध्या उरारि कडून वार्षिक ४८ कोटी, औंलशीस कडून ४१ कोटी आणि एँघ थ्षा कडून ४७ कोटी रुपये मिळतात. एशियन पेंट्सच्या कराराची रक्कम जाहीर झालेली नसली, तरी ती या आकड्यांच्या आसपास किंवा त्याहून जास्त ही किंमत असण्याची शक्यता आहे.

### स्मृती मानधनाच्या वडिलांच्या प्रकृतीबाबत अपडेट, अँजिओग्राहाफीचे रिपोर्ट्स आले समोर

मुंबई -स्मृती मानधनाचे वडील श्रीनिवास मानधना यांना तिच्या लग्नादिवशी अचानक हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. स्मृतीच्या वडिलांची प्रकृती बिघडल्याने स्मृती व पलाशचा २३ नोव्हेंबरला होणारा लग्न सोहळा रद्द करण्यात आला. स्मृती-पलाशच्या लग्नापूर्वीच्या विधींना शुक्रवारपासून सुरूवात झाली होती. हळद, मेहंदी, संगीत असे कार्यक्रम झालेले असताना लग्नाच्या काही तास आधी तिच्या बाबांना रूग्णवाहिकेतून रूग्णालयात दाखल केलं गेलं. याबाबत आता मोठी अपडेट समोर येत आहे. स्मृती मानधनाच्या वडिलांना लग्नादिवशी सकाळी छातीत डाव्या बाजूला दुखायला लागले होते. काही वेळाने रूग्णवाहिकेतून त्यांना रूग्णालयात नेण्यात आले. लग्नस्थळी रूग्णवाहिका आल्याने एकच खळबळ उडाली होती. कालांतराने स्मृतीच्या मॅनेजरने तिच्या वडिलांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना रूग्णालयात दाखल केल्याची माहिती दिली व लग्नसोहळा स्थगित झाल्याचे जाहीर केले. स्मृतीच्या वडिलांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला होता. स्मृती मानधनाच्या वडिलांना डिस्चार्ज स्मृतीच्या वडिलांची तपासणी केल्यानंत त्यांना हृदयविकाराचा झटका येण्याची लक्षणे असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# दीप्ती शर्मा कोट्यधीश होणार? वूमन्स प्रीमिअर लीग कुठे, कधी होणार?



वूमन्स प्रीमिअर लीग स्पर्धेच्या नव्या हंगामासाठी लिलाव होणार आहे. वूमन्स प्रीमिअर लीग ऑक्शन वनडे वर्ल्डकप जिंकत भारतीय महिला क्रिकेटपटूंनी इतिहास घडवला. हा इतिहास साक्षी ठेवत महिला क्रिकेटपटू वूमन्स प्रीमिअर लीग स्पर्धेत सहभागी होतील. याच स्पर्धेने अनेकींचा टीम इंडियापर्यंतचा प्रवास सुकर केला होता. यंदाच्या हंगामाआधी लिलाव होणार आहे. यंदा लिलावात सर्वाधिक बोली कुणासाठी लागणार हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. वूमन्स प्रीमिअर लीगसाठीचा लिलाव २७ नोव्हेंबरला गुरुवारी राजधानी दिल्लीत होणार आहे. दुपारी ३.३० वाजल्यापासून ही प्रक्रिया सुरू होणार आहे.

७३. यापैकी ५० भारतीय खेळाडूंसाठी तर २३ विदेशी खेळाडूंसाठी जागा उपलब्ध आहेत. प्रत्येक संघ जास्तीत जास्त १८ खेळाडू ताफ्यात घेऊ शकतात. सहा विदेशी खेळाडू असू शकतात. संघात कमीत कमी १५ खेळाडू असू शकतात.

पहिल्या टप्प्यात ६७ खेळाडू उपलब्ध असतील. त्यानंतर ॲक्सीलरेटेड ऑक्शन असेल. यासाठी फ्रँचाइजी जे खेळाडू हवेत त्यांची यादी डब्ल्यूपीएल व्यवस्थापनाला देतील. तेवढेच खेळाडू उपलब्ध असतील.

कोणाला सर्वाधिक बोली लागू शकते?

काही दिवसांपूर्वीच भारतीय संघाने वनडे वर्ल्डकप जेतेपदावर कब्जा केला. दीप्ती शर्माने .. धावा आणि विकेट्स सह मालिकावीर पुरस्कार पटकावला. दीप्ती शर्माचं नाव लिला-वात आहे. बॅटिंग आणि बॉलिंग दोन्ही आघाड्यांवर दीप्ती संघासाठी उपयुक्त आहे. त्यामुळे तिच्यासाठी मोठी बोली लागण्याची शक्यता आहे. वर्ल्डकपमध्ये डावखुरी फिरकीपटू श्री चरणीने आपल्या शिस्तबद्ध गोलंदाजीने सगळ्यांनाच प्रभावित केलं होतं. याव्यतिरिक्त ऑस्ट्रेलियाची माजी कर्णधार मॅग लॅनिंग, न्यूझीलंची अष्टपैलू अमेलिआ केर तसंच वर्ल्डकप फायनलमध्ये शतक झळकवणारी ऑस्ट्रेलियाची सलामीवीर फोबी लिचफिल्ड या सगळ्यांना चांगली बोली लागू शकते. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार आणि वर्ल्डकप स्पर्धेत : धावांची टांकसाळ उघडणारी लॉरा वॉल्व्हडार्ट आणि अष्टपैलू नॅडिन डी क्लार्क यांना उत्तम भाव मिळू शकतो.

भारताच्या प्रमुख खेळाडूंचं काय?

डब्ल्यूपीएल प्रशासनाने फ्रँचाइजींना पाच खेळाडू रिटेन करण्याची संधी दिली. यामुळे फ्रँचाइजींनी प्रमुख भारतीय खेळाडूंना रिटेन केलं आहे. यामध्ये भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, उपकर्णधार स्मृती मानधना यांच्यासह जेमिमा रॉड्रिग्ज, अमनज्योत कौर, ऋचा घोष, श्रेयांका पाटील, श्वेता शहरा यांचा समावेश आहे.

दिल्ली कॅपिटल्स- जेमिमा रॉड्रिग्ज, शफाली वर्मा, अनाबेल सदरलँड, मारिझॅन काप, निकी प्रसाद

गुजरात टायटन्स- ॲशले गार्डनर, बेथ मूनी

मुंबई इंडियन्स- हरमनप्रीत कौर, नॅट शिव्हर ब्रंट, हायले मॅथ्यूज, अमनज्योत कौर, जी.कमालिनी

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू- स्मृती मानधना, ऋचा घोष, श्रेयांका पाटील, एलिसा पेरी

युपी वॉरियर्स- श्वेता सेहरावत



आरटीएमचा पर्याय उपलब्ध आहे का?

डब्ल्यूपीएल लिलावात पहिल्यांदाच आरटीएमचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रत्येकाला युपी संघाने एकाच खेळाडूला रिटेन केलं आहे त्यामुळे ते चार खेळाडूंना आरटीएम करू शकतात. गुजरातकडे तीन तर पण ते कार्ड भारतीय खेळाडूंसाठीच वापरू शकतात कारण त्यांनी दोन विदेशी खेळाडूंना रिटेन केलं आहे. मुंबई आणि दिल्ली संघाने पाच खेळाडू रिटेन केल्यामुळे त्यांना आरटीएम कार्ड वापरता येणार नाही. आरटीएम म्हणजेच राईट टू मॅच कार्ड. संघात असलेल्या खेळाडूवर बोली लागून प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित संघ त्या खेळाडूला तेवढी रक्कम देऊन पुन्हा संघात दाखल करून घेऊ शकतो.

कोणत्या संघाकडे किती पैसा आहे?

उत्तर प्रदेश नव्याने संघबांधणी करणार आहे. त्यांच्याकडे १४.५ कोटी रुपये लिलावासाठी उपलब्ध असतील. गुजरातकडे ९ कोटी रुपये असतील. आरसीबीकडे ६.१५ तर मुंबईकडे ५.७५ कोटी रुपये आहेत. मुंबई आणि दिल्ली संघांना दहा खेळाडू खरेदी करणं आवश्यक आहे.

असोसिएट देशांचे खेळाडू लिलावात आहेत का?

असोसिएट म्हणजे छोट्या देशांचे खे-ळाडू लिलावात आहेत. असोसिएट देशाची खेळाडू असेल तर अंतिम अकरात पाच विदेशी खेळाडू खेळवण्याची मुभा संघांना देण्यात आली आहे. लिलावात असोसिएट देशांच्या चार खेळाडू असतील. तीर्था सतीश आणि इशा ओझा (युएई), तारा नॉरिस (अमेरिका) आणि तिपचा पुटावाँग (थायलंड) यांची नावं लिलावात आहेत.

वूमन्स प्रीमिअर लीग कधी होणार आहे?

७ जानेवारीला स्पर्धेची सुरुवात होणार आहे तर अंतिम लढत फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. स्पर्धेचा पहिला टप्पा नवी मुंबईतल्या डीवाय पाटील स्टेडियमवर होणार आहे तर उर्वरित सामने बडोद्यातल्या कोटांबी स्टेडियम इथे होणार आहेत. स्पर्धेच्या वेळापत्रकासंदर्भात औपचारिक घोषणा झालेली नाही.

लिलाव कुठे पाहता येईल?

स्टार स्पोर्ट्स वाहिन्या आणि जिओ हॉटस्टार ॲपवर लिलाव चाहत्यांना पाहता येईल.

## टी-२० क्रिकेट विश्वचषकाचे बिगुल वाजले, ७ फेब्रुवारीपासून सुरुवात




मुंबई,-टी-२० क्रिकेट विश्वचषकाच्या वेळापत्रकाची घोषणा झाली आहे. भारत-श्रीलंका या दोन देशामध्ये विश्वचषकाचं आयोजन करण्यात आलं आहे. ७ फेब्रुवारी २०२६ पासून टी-२० विश्वचषकाच्या १० व्या पर्वाला होणार सुरुवात होणार आहे. यामध्ये एकूण २० संघांचा समावेश असण-ार आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह तसेच रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि हरमनप्रीत कौर यांच्या उपस्थितीत टी-२० क्रिकेट विश्वचषकाच्या वेळापत्रकाची घोषणा करण्यात आली. दरम्यान, या विश्वचषकात भारताचा धडाकेबाज फलदंज रोहित शर्मावर एक मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. रोहित शर्मा टी-२० विश्वचषकाचा ब्रँड ॲम्बेसेडर असणार आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

१० वर्षांनंतर पहिल्यांदाच टी-२० विश्वचषकाच भारतात आयोजन

दरम्यान, १० वर्षांनंतर पहिल्यांदाच टी-२० विश्वचषकाच भारतात आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईसह, दिल्ली, चेन्नई, कोलकत्ता आणि अहमदाबाद येथे विश्वचषकाचे सामने होणार आहेत. तसेच श्रीलंकेतील चार ठिकाणी सामने होणार आहेत. रोहित शर्मा टी-२० विश्वचषकाचा ब्रँड ॲम्बेसेडर असणार आहे. दरम्यान, या टी-२० विश्वचषकाचे सामने भारतासह श्रीलंकेत देखील खेळवले जाणार आहेत. भारताचा ए ग्रुपमध्ये समावेश असून, यामध्ये पाकिस्तानसह अमेरिका, नामिबिया, नेदरलँड्सचा समावेश आहे.

१५ फेब्रुवारीला भारत विरुद्ध पाकिस्तान सामना होणार दरम्यान, भारताचा पहिला सामना हा अमेरिकेबरोबर असणार आहे. हा सामना ७ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे. हा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडीयम वर खेळवला जाणार आहे. त्यानंतर भार-ताचा दुसरा सामना हा नामिबिया विरुद्ध नवी दिल्लीत खेळवला जाणार आहे. हा समाना १२ फेब्रुवारी खेळवला जाणार आहे. तर तिसरा सामना हा पाकिस्तानबरोबर खेळवला जाणार आहे. हा सामना १५ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे. त्यानंतर १८ फेब्रुवारीला भारतचा सामना नेदरलँड् विरुद्ध अहमदाबादमध्ये होणार आहे. दरम्यान, भारतात हे सामने मुंबईसह, दिल्ली, चेन्नई, कोलकत्ता आणि अहमदाबाद येथे खेळवले जाणार आहेत. तसेच श्रीलंकेतील चार ठिकाणच्या मैदानावर देखील टी-२० सामने खेळवले जाणार असल्याची माहिती देण्यात

## टीम इंडियाच्या टेस्टमधील खराब कामगिरीनंतर गौतम गंभीरवर कारवाई

**प्रशिक्षकाच्या शर्यतीतून बाहेर, पोस्ट करून दिली माहिती**

दिल्ली-भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन सामन्यांची टेस्ट सीरिज खेळ-वली जात असून यातील दुसरा सामना गुवाहाटी येथे खेळवला जात आहे. कोलकतामध्ये खेळवण्यात आलेल्या पहिल्या टेस्ट सामन्यात टीम इंडियाचा ३० धावांनी पराभव झाला. ज्यामुळे दक्षिण आफ्रिकेने सीरिजमध्ये १-० ने आघाडी घेतली. आता गुवाहाटी टेस्टमध्ये सुद्धा दक्षिण आफ्रिका टीम इंडियावर भारी पडताना दिसतेय. चौथ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेने ५ विकेट्स गमावून ५४८ धावा केल्यावर डाव डिक्लेअर केला. ज्यामुळे टीम इंडियाला ५४९ धावांचं आव्हान मिळालं आहे. टीम इंडिया दुसऱ्या टेस्टमध्ये पराभवाच्या छायेत आहे आणि अशातच हेड कोच गौतम गंभीरच्या भविष्यावर सुद्धा प्रश्न उपस्थित होत आहेत. अशातच आईसलँड क्रिकेटच्या माजी ओपनरने या परिस्थितीची मजा घेत एक पोस्ट शेअर केली. आईसलँड क्रिकेट हा सोशल मीडियावर क्रिकेटशी निगडित मजेदार पोस्टसाठी ओळखला जातो. गंभीरच्या खराब चाचणी निकालांचा उल्लेख करत त्याने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर म्हटले आहे की त्याला त्यांच्या संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी आमंत्रित केले जाणार नाही. आईसलँड क्रिकेटने एक्सवर पोस्ट करत लिहिले की, मआमच्या सर्व चाहत्यांसाठी, गौतम गंभीरला नवीन राष्ट्रीय संघ प्रशिक्षक म्हणून आमंत्रित केले जाणार नाही. ते पद आधीच भरले गेले आहे आणि आम्ही २०२५ मध्ये आमचे ७५म सामने जिंकले.बीसीसीआयकडून गौतम गंभीरला हेड कोच पदावरून टवण्यासंदर्भात कोणतेही विधान किंवा संकेत देण्यात आलेले नाहीत. मात्र टीम इंडियाच्या टेस्ट क्रिकेटमधील

# ऋषभ पंतवर घणाघाती टीका, माजी क्रिकेटरने काळजीवाहू कर्णधाराला ठरवले गुन्हेगार



**नवी दिल्ली-** भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात दुसरा टेस्ट सामना गुवाहाटी येथे खेळवला जा-तोय. पहिल्या टेस्टमध्ये दक्षिण आफ्रिकेने भारतावर विजय मिळवून सीरिजमध्ये १-० ने आघाडी घेतली. तर गुवाहाटी टेस्टमध्ये सुद्धा दक्षिण आफ्रिका टीम इंडियावर भारी पडताना दिसतेय. कर्णधार शुभमन गिल हा दुखापतीमुळे दुसऱ्या टेस्ट सामन्याचा भाग नाही. अशावेळी ऋषभ पंत हा मैदानात टीम इंडियाचं नेतृत्व करतोय. हाफ्लंदाजीच्या पहिल्या इनिंगमध्ये टीम इंडिया समोर धावांचा डोंगर असताना पंतने निष्काळजीपणाने एक शॉट खेळला आणि त्याची विकेट दिली. त्यानंतर एका माजी क्रिकेटरने कर्णधार पंतवर घणाघाती टीका करून त्याला गुन्हे-गार ठरवले. शुभमन गिल दुखापतग्रस्त असल्याने बाहेर आहे त्यामुळे आता ऋषभ पंतच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित होत आहेत. गुवाहाटी टेस्टमध्ये टीम इंडिया संघर्ष करतेय. टी

### २०१ धावांवर ऑलआउट झाला संघ

**तिसऱ्या दिवशी टीम इंडियाला २०१ धावांवर ऑल आउट करण्यात दक्षिण आफ्रिकेला यश आले. तर दक्षिण आफ्रिकेने हाफ्लंदाजीच्या दुसऱ्या इनिंगमध्ये दिवसाअंती ३१४ धावांची आघाडी घेतली. चौथ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेच्या हाफ्लकंदाजांनी आक्रमक हाफ्लंदाजी सुरु ठेवली ज्यामुळे बातमी लिहीपर्यंत त्यांनी भारताविरुद्ध ४२१ धावांची आघाडी घेतली आहे.**

ब्रेकनंतर पंत बाहेर गेला पण तो हाफार काळ टिकला नाही. मोठा शॉट मारण्याच्या प्रयत्नात त्याने सॉहाभ्ट कट खेळला आणि विकेटकिपर काइल व्हेरेनने त्याला झेलबाद केले. त्यानंतर टीम इंडिया अडचणीत सापडली.

कोणी केली टीका?

माजी सिलेक्टर सबा करीमने ऋषभ पंतच्या शॉट सिलेक्शनवर टीका केली. एड्झछ्ऊीळलळपषे

### चुकीच्या शॉटवर बाद झाला पंत

**ऋषभ पंत हा मैदानात आडवे तिडवे शॉट खेळण्यासाठी प्रसिद्ध आहे. मात्र अनेकदा यामुळे त्याला विकेट गमवावी लागते आणि त्याच्यावर टीका देखील होते. यापूर्वी एकदा ऑस्ट्रेलियात अशाच एका शॉटमुळे कॉमेंट्री बॉक्समध्ये बसलेल्या माजी क्रिकेटर सुनील गावस्करांनी त्याला तीनदा मएूल्ज्फम्हणून संबोधले होते. ऋषभ पंत ७ धावा करून बाद झाला आणि अशावेळी बाद झाला की जेव्हा टीम इंडियाला एका टिकाऊ हाफ्लंदाजांची आवश्यकता होती.**

वर बोलताना करीम म्हणाला की कर्णधाराचा निर्णय हैराण करणारा होता. सबा करीम म्हणाला की, मत्यामागे कोणतेही लॉजिकल कारण नाही. कदाचित त्याच्या टेस्ट कारकिर्दीत पहिल्यांदाच, ऋषभ पंत स्वत: त्या शॉटला न्याय देण्यासाठी संघर्ष



करत असेल. हे टी ब्रेकनंतर लगेच घडले आणि कर्णधार म्हणून त्याच्याकडून ही जबाबदारी घेण्याची अपेक्षा आहे. या पातळीवर त्याच्याकडे दबाव हाताळण्यासाठी आणि अडचणींना तोंड देण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी पुरेसा अनुभव आहे. त्याच्याकडे या पातळीवर इतका अनुभव आहे की तो दबाव हाताळू शकतो आणि अडचणी पत्करून मार्ग दाखवू शकतो.

# बिल न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरु

## – नोव्हेंबर अखेर ५८ कोटी १८ लक्ष रूपये वसुलीचे आव्हान, केवळ ६५ टक्केच वसुली
## – १०६९ वीजग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडीत
## – त्वरीत वीजबील भरण्याचे महावितरणचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरणने नोव्हेंबर महिन्याची व थकीत वीजबिलांची वसुली मोहीम हाती घेतली असून गेल्या पंचेवीस दिवसात केवळ ६५ टक्केच वसुलीचे उदिष्ट साध्य करण्यात यश मिळाले आहे. उर्वरीत पाच दिवसात महावितरणला २० कोटी २ लाख रूपयांची थकबाकी वसुली करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी आपल्या थकीत बीजबीलांचा भरणा करून सहकार्य करावे अन्यथा नाईलाजास्तव वीजपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करावी लागेल असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणच्या लातूर मंडळासाठी वरिष्ठ कार्यालयाने लघूदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील वीजबील वसुलीसाठी नोव्हेंबर महिन्याचे चालू बिलाचे ५८ कोटी १८ लाख व थकबाकीचे १०१ कोटी ९३ लाख असे एकत्रीत १६० कोटी ११ लाख रूपयांचे लक्ष्य निर्धारीत केले आहे. या लक्ष्याचा पाठलाग करत मागील २५ दिवसात केवळ ३७ कोटी ९८ लाख रूपयांची वीजबील वसुली झालेली आहे. हे प्रमाण खूपच कमी असून येणाऱ्या पाच दिवसात उर्वरीत थकबाकी सोडून चालू महिण्याचे २० कोटी २ लाख रूपयांची वसुली होणे महावितरणसाठी तारेवरची कसरत ठरणार आहे. वसुलीसाठी मंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी दारोदार फीरत आहेत, मात्र जिल्हयातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील वीजग्राहकांकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत नाही. त्यामुळे वीजपुरवठा खंडीत करण्याशिवाय महावितरणसमोर दुसरा पर्याय उरलेला नाही. वीजबील न भरल्यामुळे आजपर्यंत १०६९ वीजग्राहकांचा तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

लातूर मंडळा अंतर्गत येणाऱ्या लातूर विभागातील लघुदाब वर्गवारीच्या वीजग्राहकांकडे नोव्हेंबर महिण्याची ३२ कोटी २८ लाख थकीत असून कालपर्यंत २२ कोटी ४ लाख रूपये वसुली झाली आहे. निलंगा विभागातील वीजग्राहकांकडे ९ कोटी ६४ लाख थकीत असून कालपर्यंत ५ कोटी ७८ लाख रूपये वसुली झाली आहे. तर उदगीर विभागातील वीजग्राहकांकडे १६ कोटी २६ लाख थकीत असून कालपर्यंत १० कोटी १६ लाख रूपये वसुली झाली आहे. वसुलीचे हे प्रमाण आत्तापर्यंतचे अत्यल्प प्रमाण आहे. थकबाकीदार वीजग्राहकांना एसएमएस द्वारे, प्रत्यक्ष फोन करून तसेच वीजकायद्यान्वये रीतसर नोटीस कालावधी उलटूनही



गेला तरीही वीजग्राहक बील भरण्यास दिरंगाई करत असल्याचे दिसून येत आहे. वीजबील भरण्यासाठी महावितरणने विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. या सुविधांचा लाभ घेत वीजग्राहकांना घरबसल्याही बील भरता येणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी त्वरीत वीजबीलाचा भरणा करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

## रेणापूरात भाजपाच्या प्रचार फेऱ्यांना मतदारांकडून मोठा प्रतिसाद; घरोघरी उमेदवारांचे उत्स्फूर्त स्वागत



**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायत निवडणुकीचा प्रचार आता दिवसेंदिवस रंग भरू लागला असून भाजपाच्या वतीने नगरपंचायत क्षेत्रात प्रचार दौरे केले जात आहेत भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड आणि प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्या माध्यमातून रेणा नगरीत झालेल्या विविध विकास कामामुळे भाजपाच्या प्रचार दौऱ्याला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. घरोघरी उमेदवारांचे उत्साहाने स्वागत केले जात आहे.

भाजपा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती शोभा शाम आकनगिरे यांनी मंगळवारी दि. २५ सकाळी शहरातील बालाजी मंदिर परिसर, सुतार गल्ली, गाडे गल्ली,महादेव मंदिर परिसर, धनगर गल्ली, साठेनगर, बौद्ध नगर, एकुरके गल्ली तसेच बसवेश्वर चौक ते नगरपंचायतकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंची वसाहत, संभाजी नगर या परिसरात घरोघर जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या,त्यांचे आशीर्वाद घेतले.

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती शोभा आकनगिरे यांच्या समवेत भाजपाचे उमेदवार अच्युत कातळे, धम्मानंद घोडके, सौ. धरती महेश गाडे, दत्ता सरवदे यांच्यासह सौ. खैरूनिसा आतार यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार आणि नागरिक मोठ्या संख्येने प्रचार फेरीत सहभागी झाले होते.

श्रीमती शोभाताई आकनगिरे व सर्व उमेदवारांनी मतदारांच्या घरी भेटी दिल्या. यावेळी त्यांचे ठिकठिकाणी पुष्पहार घालून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. महिलांनी उमेदवारांना औक्षवण केले. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच विविध योजनांच्या लाभार्थ्यांनी भाजपाच्या ताब्यात नगरपंचायत असल्याने आपल्याला या योजनांचा लाभ मिळू शकला, हे उमेदवारांना समक्ष भेटून सांगितले. यावेळीही आम्ही भाजपाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही दिली. या प्रचार दौऱ्यांना मतदारांसह महिला आणि तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. शेकडोंच्या संख्येने महिला, तरुण रॅलीमध्ये सहभागी होत आहेत. विशेष म्हणजे जनतेच्या मनातील उमेदवार दिल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.अनेक प्रभागात नागरिकांनी दारांसमोर रांगोळ्या काढून प्रचारफेरीचे स्वागत केले.

## लातूर मनापात कार्यशाळा; ई ऑफिस प्रणाली हाताळणी विषयावर आयुक्तांचे मार्गदर्शन




**लातूर/प्रतिनिधी :** ई ऑफिस प्रणाली या विषयावर लातूर मनपात एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.आयुक्त श्रीमती मानसी यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

महानगरपालिकेतील सर्व प्रशासकीय कामकाज पूर्णपणे डिजिटल पद्धतीने, अधिक वेगवान आणि पारदर्शक बनवणे हा या कार्यशाळेच्या आयोजनामागचा उद्देश होता. ई–ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून फाईल प्रक्रिया, पत्रव्यवहार, मंजुरी प्रक्रिया नोंदी ठेवणे तसेच दस्तऐवजांचे डिजिटल व्यवस्थापन अधिक सुलभ व सुटसुटीत होणार आहे.

प्रारंभी आयुक्त श्रीमती मानसी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी ई ऑफिस प्रणालीची गरज, शासनाच्या डिजिटलायझेशन धोरणाची अंमलबजावणी तसेच नागरिकांना मिळणाऱ्या जलद आणि पारदर्शक सेवांची माहिती दिली.

यावेळी ऑफिस पोर्टलमध्ये लॉगिन व युजर व्यवस्थापन,नवीन फाईल तयार करून पाठवणे,ई नोटींग व इतर ड्राफ्टिंग, दस्तऐवज अपलोड व ट्रेकिंग,मंजुरी प्रक्रिया, डिजिटल पद्धतीने पूर्ण करणे,प्रलंबित फाईल्सचे निरीक्षण व मॉनिटरिंग यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

महाआयटीच्या अर्चना खंदाडे यांनी सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. ई ऑफिसचा प्रभावी वापर कसा करावा ? या संदर्भातील त्या बोलल्या. लातूर मनपाच्या वतीने प्रशासनातील पारदर्शकता, गती, उत्तरदायित्व आणि डिजिटल परिवर्तन यांना चालना देण्याचे विशेष महत्त्व आहे. आगामी काही दिवसात मनपाच्या सर्व विभागात ई ऑफिस प्रणालीचा पूर्ण अवलंब केला जाणार असल्याची माहिती विभाग प्रमुखांनी दिली. या कार्यशाळेस अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्यासह विभाग प्रमुख उपस्थित होते.

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट साठी एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील डॉ. ऋतुजा अंबुलगेकर, डॉ. स्नेहल गावडे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** येथील एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील एम.पी.टी. एच. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. ऋतुजा नागोराव अंबुलगेकर व डॉ. स्नेहल दिनकर गावडे यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक () यांच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४–२५ () या संशोधन कार्यासाठी नुकतीच निवड झाली आहे. राज्यातील शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतून सदरील संशोधनासाठी ही निवड झाली आहे.



गेल्या एप्रिल २०२५ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४–२५ () या संशोधन कार्यासाठी राज्यभरातील बी.पी.टी.एच. व एम.पी.टी.एच. फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागवले होते. त्यामध्ये एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी संशोधन कार्यासाठी प्रस्ताव पाठवले होते. यामध्ये २५ पैकी एम.पी.टी.एच. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. ऋतुजा अंबुलगेकर व डॉ. स्नेहल गावडे या विद्यार्थीनीच्या प्रस्तावाची निवड करण्यात आली आहे.

या मध्ये ''सक्रिय मुक्तता तंत्र आणि गतिशील ताणण्याच्या तंत्राचा वरच्या मान आणि खांद्यामधील त्रिकोणी स्नायूवरील वेदना, हालचालींची श्रेणी आणि मानदुखीतील अक्षमतेवर होणाऱ्या परिणामांची तुलना: नियंत्रीत व सरळपणे निवडलेली चाचणी'' या विषयावर डॉ. ऋतुजा अंबुलगेकर तर ''स्पास्टिक डायप्लेजिक सेरेब्रल पाल्सी असलेल्या मुलांमध्ये संतुलनावर वेस्टिब्युलर व्यायाम कार्यक्रम आणि कार्य–केंद्रित प्रशिक्षणाचा परिणाम: एक तुलनात्मक अभ्यास'' या विषयावर डॉ. स्नेहल गावडे संशोधन करणार आहेत.

येत्या सप्टेंबर २०२६ पर्यंत सदरील संशोधन पुर्ण करुन ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहे. या संशोधन कार्यासाठी एमयुएचएसकडून प्रत्येकी सहा व चार हजार एवढे विद्यावेतन मिळणार आहे.

या निवडीबद्दल डॉ. ऋतुजा अंबुलगेकर व डॉ. स्नेहल गावडे यांचे एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मार्गदर्शक डॉ. रिशा कांबळे, डॉ. पराग नारायणकर, विभाग प्रमुख डॉ. गौरव भटनागर, डॉ. सिंगारा वेलन यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतून अभिनंदन होत आहे.

## रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत पाणी, रस्ते आणि अस्वच्छतेचे मुद्दे तापले

### मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिक त्रस्त, भाजपा नेत्यांविरुद्ध असंतोष

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायत निवडणुक प्रचाररास वेग आला असून, येथे काँग्रेस भाजपा मध्ये सरळसरळ लढत होत आहे. शिवसेना ठाकरे गटाचा उमेदवारही आपले नशीब आजमावत आहे, त्यांनीही आपल्या प्रचाराला सुरुवात केली आहे, परंतु सेनेच्या ११ उमेदवारांनी अचानक माघार घेतल्याने सर्वानाच धक्का दिला आहे. त्यामुळे निवडणुकीत चांगलीच रंगत आणली आहे.

रेणापूर नगरपंचायतीवर मागील अनेक वर्षे भाजपाची सत्ता राहिली आहे. इतकी वर्षे सत्ता देऊनही भाजपाला साध्या नागरि समस्याही सोडवता आल्या नाहीत, असा आरोप केला जात असून शहरातील अनेक ठिकाणी पाणीपुरवठा, खराब रस्ते, घरकुल योजना आणि अस्वच्छतेच्या प्रश्नांवरून भाजपा उमेदवारांना घेरले जात असून नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. नगरपंचायत होऊन अनेक वर्षे उलटली, तरी मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

**रेणापूरात अनेक वर्षांपासून समस्या कायम**

रेणापूर नगरपंचायतीची स्थापना होऊन अनेक वर्षे झाली, तरी पाणी, रस्ते आणि कचरा व्यवस्थापनाच्या समस्या कायम आहेत. भाजप नेते निवडणुकीच्या वेळी आश्वासने देतात, पण नंतर दुर्लक्ष करतात, असा नागरिकांचा आरोप आहे.

**राजकीय भांडणात मतदारांचे प्रश्न हरवले**

रेणापूरमध्ये ९ वर्षांनंतर होतअसलेल्या नगरपंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय आरोप–प्रत्यारोप सुरू आहेत. सत्ताधारी भाजपा विकासाचे दावे करत आहेत, तर विरोधक त्यांना आव्हान देत आहेत. मात्र, या सर्व राजकारणात सर्वसामान्यांचे मूलभूत प्रश्न दुर्लक्षित झाल्याचे चित्र आहे.

**भाजपाची कसोटी**

अतिवृष्टीमुळे रेणापुर शहरांमधील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. निधीअभावी दुरुस्ती रखडली आहे. अनियमित व स्वच्छ पाणीपुरवठा आणि स्वच्छतेचीही वाईट अवस्था आहे. यामुळे लोकांमध्ये सत्ताधाऱ्यां प्रति रोष आहे. निवडणुकीच्या तोंडावर दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा करण्याच्या आश्वासनाची पूर्तता झाली नसल्यानेही नाराजी आहे.

**नेत्यांबद्दल अविश्वास**

अनेक वर्षांपासून नगरपंचायतीत सत्तेत असलेल्या नेत्यांनी मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष केल्याने मतदारांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला आहे.

निवडणुकीच्या वेळी दिलेली आश्वासने पूर्ण होत नाहीत, असा अनुभव अनेक नागरिकांनी घेतला आहे. त्यामुळे या निवडणुकीत सत्ताधारी भाजपा विरोधात वातावरण चांगलेच तापले असून काँग्रेस पक्षाला या परिस्थितीचा फायदा होईल का ते पहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## नागरिकांनी मतदार यादीतील नावाची पडताळणी करून घ्यावी : शहर जिल्हा भाजपाच्यावतीने आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाच्या वतीने प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात आलेली आहे. या मतदार यादीमध्ये एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात जोडल्या गेल्या असल्याच्या तक्रारी होत आहेत. याबाबत शहर जिल्हा भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने मनपा आयुक्तांची भेट घेऊन मतदार यादींची दुरुस्ती करण्याचे निवेदन दिलेले आहे. शहरातील नागरिकांनी आपआपल्या मतदार यादीत आपल्या नावांची पडताळणी करून घ्यावी असे आवहान करून या प्रकरणी तक्रार असल्यास प्रशासनाची किंवा पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्याशी संपर्क साधावा असे आवहान करण्यात आले आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाच्यावतीने प्रारूप मतदार यादी जाहीर केलेली असून यामध्ये अनेक चुका झालेल्या असून वेगवेगळ्या प्रभागातील विविध मतदारांची नावे वेगळीकडे जोडली गेली आहेत. तसेच शहरा नजीक असलेल्या वेगवेगळ्या ग्रामपंचायत हद्दीतील मतदारांची नावे समाविष्ट झाली असल्याच्या तक्रारी येत आहेत. या मतदार यादीतील चुकांमुळे अनेक मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. मतदार यादीचे वाचन केल्यानंतर शहर जिल्हा भाजपाच्या शिष्टमंडळाने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वात मनपा आयुक्त मानसी मिना यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. मतदार यादीतील या चुका दुरुस्त करण्याची मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर याबाबतच्या हरकती लवकरच प्रशासनाकडे दाखल करण्यात येतील असे सांगितले आहे. मनपा प्रशासनाने निवेदनाची व हरकतींची दखल घेऊन मतदार यादी दुरुस्त करावी अशी भूमिका शहर जिल्हा भाजपने मांडली आहे. याबाबत आयुक्त मानसी मिना यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हरकती नुसार मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्यात येईल असे सांगून मतदानापासून कोणीही वंचित



राहणार नाही असा विश्वास दिला.

मनपा प्रशासनाने मतदार यादी दुरुस्त करण्यात येईल असे सांगितले असले तरी शहरातील नागरिकांनी आपआपल्या मतदार यादीत आपल्या नावाची पडताळणी करून घ्यावी असे आवहान शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी लातूरकरांना केले आहे. मतदार यादीबाबत काही आक्षेप असल्यास तो प्रशासनाकडे दाखल करावा असे सांगून याबाबत शहर जिल्हा भाजपा पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा असे आवहान केले आहे.

## औसा तालुका काँग्रेस पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी दिल्या शुभेच्छा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज सकाळी बाभळगाव निवासस्थानी औसा तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी श्री. किरण बाबळसुरे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सन्मान व अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.


तसेच श्री. संजय सुग्रीव लोंढे यांची औसा विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाल्या संदर्भात त्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचेही यावेळी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी अभिनंदन केले व पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर



कारखान्याचे व्हा. चेअरमन सचिन पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे, ॲड. बाबासाहेब गायकवाड, प्रकाश मिरगे, केशव भोसले, सौ. स्वयंप्रभा पाटील, वाघम्बर कांबळे, बाळासाहेब सांगवे, महादेव बिराजदार यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# थंडीमुळे सर्दी, खोकला अन् तापाचे रुग्ण वाढले:२७१३ जणांवर उपचार

## विलासराव देशमुख शासकीय रुग्णालयात मागील सहा दिवसात गर्दी वाढ

**लातूर/प्रतिनिधी :** शहरात मागील आठवड्याभरापासून थंडीने जोर पकडला आहे. शहराचे तापमान हे १५ ते १७ अंश सेल्सियसपर्यंत घसरले आहे. परिणामी लातुरात थंडीमुळे उद्भविणारे सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, डोकेदुखी आदी संसर्गजन्य आजारांबरोबच कान-नाक-घसा, अस्थमा-दिर्घ दम्याचे रूग्ण वाढले आहे. लातूर शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालया मागील सहा दिवसांमध्ये मेडिसिन विभागांतर्गत सर्दी-ताप-खोकला, लर्जी, संधिवात अशा आजारांचे ११७८, त्वचा व गुप्तरोगाशी संबंधित ६४४, कान-नाक-घसा ३४८ तर टीबी-चेस्ट संबंधित २३ रूग्णांची नोंद झाली आहे.



लातूर शहर आणि परिसरात थंडिचा कडाका वाढत आहे. संपूर्ण दिवसभर वातावरण आणि पहाटे आणि संध्याकाळी पडणाऱ्या कडाक्याच्या थंडीमुळे नागरिकांना वातावरणीय बदलामुळे होणाऱ्या विविध आजारांना बळी पडावे लागत आहे. यामध्ये ताप, सर्दी, पडसे, खोकला आदी संसर्गजन्य आजारामध्ये वाढ होत आहे. शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयाच्या बाह्यरूग्ण विभागात उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांची संख्या वाढली आहे. यामध्ये सर्वाधिक रूग्ण हे ताप, सर्दी, खोकल्याचे आहेत. थंड हवेशी संपर्क आल्यामुळे आजार वाढत आहेत. त्याचबरोबर आजारी व्यक्तीशी संपर्क आल्यामुळे एकाच घरातील अनेक व्यक्ती हे आजारी पडत असल्यामुळे रूग्णसंख्या वाढत आहे.

वाढत्या थंडीचा परिणाम हा त्वचेवरदेखील होत आहेत. यामध्ये त्वचा कोरडी होऊन खवले येणे, पायांना भेगा, खाज सुटणे, शरीराच्या विविध भागांमध्ये पुरळ येणे, डोक्याच्या त्वचेत चिकट कोंडा शिवाय रोसिस हा त्वचेचा आजार अनेकांमध्ये वाढत आहे. याशिवाय डोळ्यांखाली काळी वर्तुळे, लालसर मान, पुरळ, आणि एक्झिमा यांसारख्या समस्या असलेले रूग्णसंख्या वाढत आहे. त्याचबरोबर हिवाळ्यातील थंडीचा सर्वाधिक धोका हा जुनाट आजार असलेल्या दमा (अस्थमा) असलेल्या रूग्णांना जाणवत असल्यामुळे धाप वाढते, श्वास घेताना त्रास होणे असे रूग्ण वाढत आहेत. याशिवाय कान-नाक-घसा संबंधित रूग्णसंख्याही वाढत आहे. नाक कोंदणे, कानातून पाणी येणे, कानाच्या पडद्यामागे पु भरणे असे रूग्ण वाढत आहे. त्याचबरोब सर्दी झालेल्या बालकांमध्ये कान दुखन्याचे प्रमाणही वाढले असल्याचे संबंधित विषयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले आहे.

वाढत्या थंडीमुळे विविध आजारांच्या रूग्णांची थंडी वाढत आहे. दम्याच्या रूग्णांनी त्याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांनी या काळात थंड पाणी पिऊ नये, थंडीपासून बचाव करण्यासाठी गरम-उबदार कपडे घालावेत. कोणताही आजार अंगावर न काढता रूग्णालयात जावून औषधोपचार घ्यावा.

**– डॉ. अभिजीत यादव, श्वसनविकार तज्ज्ञ (शासकीय रूग्णालय, लातूर)**

# अहमदपूरला विकास निधी भाजपामुळे – भाजप नेत्यांचे वक्तव्य



**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर नगर परिषदेची निवडणूक भाजप स्वबळावर संपूर्ण ताकतीने लढून जिंकणार असुन राष्ट्रवादीच्या सहकार मंत्र्यांना धडा शिकवणार असल्याचे मत भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केले. अहमदपूर नगर परिषदवर भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.अहमदपूर नगर परिषद निवडणुकीत भाजप ला विश्वासात न घेता सहकार मंत्र्यांनी भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसलाल्यामुळे भाजपाला स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घ्यावा लागला . देशात भाजपाचे नरेंद्र मोदींजीचे व महाराष्ट्रात भाजपाचे देवेंद्रजी फडणवीस यांचे सरकार असल्याने अहमदपूर नगर परिषद मध्ये सुध्दा भाजपाच्या नगराध्यक्षासह नगरसेवकांना निवडून द्या.शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचे आश्वासन भाजपाच्या नेत्यांनी दिले. लाडकी बहीण योजना ही मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी चालू केली असून थोड्याच दिवसात लाडक्या बहीणीला दिड हजारांहून दोन हजार रुपये भाजपाचे सरकार करणार आहे. सहकार मंत्र्यांच्या व दोन्ही राष्ट्रवादी च्या भुल थापांना बळी न पडता भाजपाच्या उमेदवारांना मतदार रुपी आशिर्वाद द्यावा असेही भाजपाच्या नेत्यांनी आयोजित कॉर्णर बैठकीत अहवान केले. शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील कमलबाई आगलावे व ॲड.अजिंक्य चामे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड.स्वप्णील व्हते यांच्या निवडणूक प्रचारार्थ एक व्यापक कॉर्णर बैठक आयोजित करण्यात आली होती. शहरातील सर्व १२ प्रभागात भाजपाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ कॉर्णर बैठका व मतदाराचा थेट गाठीभेटी घेऊन भाजपाने झंझावात चालू केला आहे.

सदरील बैठकीत अहमदपूर नगर परिषद निवडणुकीचे प्रमुख गणेश दादा हाके पाटील, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,माजी आमदार बब्रुवान खंदाडे,माजी नगराध्यक्ष ॲड.भारत चामे, माजी सभापती अशोक काका केंद्रे, अहमदपूर नगर परिषद निवडणुकीचे प्रचार प्रमुख गोविंद गिरी, हेमंत गुट्टे, रामानंद मुंडे,बालाजी आगलावे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार ड. स्वप्निल व्हते, यांच्या सह प्रभाग क्रमांक ५ मधील मतदार मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते .

## अज्ञात वाहनाची दुचाकीस्वाराला धडक; गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी:** तालुक्यातील गाधवड शिवारातील कॅनॉलजवळ एका दुचाकीस्वारास अज्ञात भरधाव वाहनचालकाने पाठीमागून जोराची धडक दिली. यामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी जखमीची पत्नी वैशाली नामदेव देशमुख (वय २५, रा. शिराळा) यांच्या फिर्यादीवरून मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धडक बैंऊन वाहनधारकाने तेथून पळ काढल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अधिक तपास पोलीस उपनरीक्षक चव्हाण करीत आहेत.

# निटूर भागात १० वासरांच्या मृत्यूने खळबळ!

**लातूर/प्रतिनिधी :** निलंगा तालुक्यातील निटूर आणि आसपासच्या गावांमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून गाई-म्हशींच्या वासरांचा अचानक मृत्यू होत असल्याने पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. निरोगी दिसणारी वासरे काही तासांत अशक्त होऊन दगावत असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.या मृत्यू मागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून,पशुवैद्यकीय विभागाकडून तथ्यांची तातडीने तपासणी सुरू आहे.

मृत्यू झालेल्या वासरांमध्ये ताप,अशक्तपणा,अतिसार किंवा अचानक श्वास घेण्यास त्रास होणे,अशी लक्षणे आढळली आहेत.प्राथमिक अंदाजानुसार विषाणुजन्य संसर्ग, दूषित चारा-पाणी किंवा परजीवींचा प्रादुर्भाव या कारणांची तपासणी केली जात आहे, परंतु नेमके निदान होईपर्यंत चिंता कायम आहे.

## पशुपालकांत भीती:वाढलेल्या थंडीचा परिणाम असल्याचा आरोग्य विभागाचा प्राथमिक अंदाज

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा आर्थिक धक्का आहे. वासरांचे दगावणे म्हणजे भविष्यातील दूध उत्पादनाचे नुकसान आहे.

दरम्यान, निटूर पशुवैद्यकीय दवाखान्याकडून गावपातळीवर मोहीम राबवली जात आहे.अधिकारी गोठ्यात स्वच्छता, कोरडा चारा आणि परजीवी नियंत्रणावर भर देण्याचे आवाहन करत आहेत.या वासरांच्या मृत्यूची कारणे लवकर स्पष्ट होऊन तातडीचे उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे,अशी मागणी होत आहे.

शेतकऱ्यांचे मोठे नुकसान अलीकडील पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे पीक नुकसानग्रस्त झाले आहे. अशा परिस्थितीत दुधाचा व्यवसाय हा त्यांचा मुख्य आर्थिक आधार आहे. निटूर येथील अनिल पाटील यांची दोन, प्रवीण पाटील यांचे एक, संदीप पाटील यांचे दोन, नागनाथ कनशिट्टे यांचे दोन, तसेच अमर निटुरे,



दिलीप तापडिया आणि विरनाथ लड्डा यांचे प्रत्येकी एक वासरू दगावले आहे. या सामूहिक नुकसानीमुळे शेतकऱ्यांची भविष्यातील दूध उत्पादनाची साखळी कोसळण्याची भीती वाढली.

> वाढलेल्या थंडीमुळे लहान वासरांचा मृत्यू वातावरणातील बदलामुळे व वाढलेल्या थंडीमुळे लहान वासरांचा मृत्यू होत आहे. पशुपालकांनी लहान वासरांची काळजी घ्यावी आणि काही आजाराची लक्षणे दिसत असतील तर पशुवैद्यकीय दवाखान्याशी त्वरित संपर्क करावा.
>
> **– अक्षय चिलमे, पशुवैद्यकीय अधिकारी**

## संविधानस्वरुप...

भारतीय संविधानास
भिमरावे दिले स्वरुप
चकित होती वाचता
अवघ्याजगांस अप्रुप

सर्वसमावेशक संग्रह
परिश्रमअहोरात्र खूप
उद्देशिकेतून प्रतीत रे
सामर्थ्य कळे अनुरुप

टाळल्या कायद्यातूनि
प्रथा व्यथा त्या विद्रुप
कुठेही नसे त्रुटी मुळी
टिकाकारहीचिडीचूप

पंचवीस भागा समृद्ध
हक्कअधिकाररंगरुप
बारा अनुसूचि मार्फत
समानता हो सुखरूप

समानन्याय सकलास
व्यवस्थे बांधे एकरूप
मुक्तते जाण संविधान
खजिन्यां नाही कुलूप

बदलावे का संविधान
मना विचार ये विरूप
अफवा पसरी गुपचुप
करायला हवेयं रे चूप

जाण शिल्पकार कष्ट
बनवता सबल प्रारुप
संविधान दिन साजरा
अंतर्मनात नवा हुरूप

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## रेणापुरात ज्ञानोबा पांचाळ, सुभाष सोनटक्के यांचा सत्कार: मुंबई कला अध्यापक संघातर्फे केला सन्मान

**रेणापूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य कला अध्यापक संघ मुंबई तालुका शाखा रेणापूर तर्फे दि.२१ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त कला शिक्षक तिरुपती विद्यालय पानगाव येथील ज्ञानोबा पांचाळ व छत्रपती शिवाजी विद्यालय बिटरगाव येथील कला शिक्षक सुभाष सोनटक्के यांचा श्रीराम विद्यालय रेणापूर येथे सेवा पूर्ती निमित्त सत्कार करण्यात आला.

शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या मार्फत एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा दि. २१ नोव्हेंबर रोजी श्रीराम विद्यालय केंद्रावर संपन्न झाल्या. त्यानिमित्ताने तालुक्यातील सर्व कलाध्यापक एकत्र आले होते. त्यांच्या वतीने व प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे,सांस्कृतिक विभाग प्रमूख अमृतेश्वर स्वामी,कला अध्यापक संघाचे अध्यक्ष संजय जाधव,तालुका सचिव रंगनाथ बारस्कर,गोपाळ सब्बनवार आदींची उपस्थिती होती. पांचाळ व सोनटक्के दोन्ही शिक्षक कलाप्रेमी व सुप्त कलामूणाना वाव देणारे विद्यार्थी प्रिय शिक्षक होते, असे मत प्राचार्य सिद्धेश्वर



मामडगे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमूख अमृतेश्वर स्वामी यांनी मानले.

# कृत्रिमरीत्या फळे पिकविण्यावर कडक कारवाईची मागणी

## घातक रसायनांचा वापर; एफडीएचे दुर्लक्ष, नागरिकांतून नाराजी

**रेणापूर/प्रतिनिधी :** झाडावरून तोडलेली फळे नैसर्गिकरित्या पिकण्यासाठी किमान तीन आठवडे लागतात. परंतु झटपट नफा कमावण्यासाठी फळ विक्रेते फळे पिकविण्यासाठी सर्रासपणे घातक रसायनांचा वापर करीत आहेत. हि नियमबाह्य आणि अवैद्य पद्धतीने होणारी फळ प्रक्रिया रोखण्यासाठी व संबंधितांवर कठोर कारवाई करण्यासाठी राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने निर्देश दिले असतांनाही सर्रासपणे फळे पिकविण्यासाठी आजही घातक रसायनांचा वापर केला जात आहे. याची कडक अंमलबजावणी व्हावी अशी मागणी सर्वसामान्यांकडून केली जात आहे.

आंबा, चिकू, पपई, संत्रे मोसंबी अशा जाड सालपटाच्या कच्ची फळे पिकविण्यासाठी फळ विक्रेते सर्रासपणे कॅल्शियम कार्बाइडचा तर केळी पिकविण्यासाठी इकॉन या केमीकलचा वापर करतात. तर सफरचंदाला मेन लावून त्याला चकाकी आणणे तसेच पपई व टरबुजाला स्टेरॉईड सारखे घातक इंजेक्शन देणे हे प्रकार सर्रासणने घडत असल्याचे दिसून येते हे प्रकार रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणण आणि अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात बेकायदेशीर रसायणांचा किंवा गॅसचा वापर करून फळे कृत्रीम पद्धतीने पिकविण्याचे प्रकार आढळल्यास अन्न सुरक्षा मानके कायद्या अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार असल्याचे निर्देश देण्यात आल्याचे सांगितले जाते.

त्याअनुसंगाने संबंधीत विभागाकडुन विशिष्ट कालावधीत फळांचे नमुने तपासण्यात आले. मानके नियमानुसार कार्बाइड गॅसचा वापर करून फळे पिकविण्यावर पुर्ण बंदी असतांना व १०० पीपीएम तीव्रतेपर्यंत इथिलिन गॅसच्या नियंत्रीत वापरास मर्यादीत परवानगी असतांना त्याची फळविक्रेत्यांकडुन अमंलबजावनी होते का ? हा प्रश्न जनसामान्यांमधुन उपस्थित केला जात आहे.

याबाबत जनजागरन करण्यासाठी व फळे पिकविण्याच्या वैज्ञानिक पद्धतीवरील कार्यशाळा आयोजित करून मार्गदर्शन व जनजागृती करण्यासाठी सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात असे संबंधीत विभागाने आदेशीत केले असतांना या आदेशाची कृषी उत्पन्न बाजार समितीकडुन अंमलबजावणी होत आहे कां ? हेही पाहणे महत्वाचे ठरणार आहे. यावर कडक धोरण अवलंबिले तर खरोखरच रसायनांचा आणि अवैद्य पद्धतीचा वापर करून कृत्रिमरित्या फळे पिकविणाऱ्या फळ विक्रेत्यांवर वचक राहिल असे झाल्यास फळविक्रेत्यांनाही त्याचा विचार करावा लागणार आहे.

नैसर्गिकरीत्या फळे पिकविल्यास त्याची घणता कमी होऊन फळांचा रंग बदलतो व त्याला सुगंध येतो शिवाय त्याची चवही विकसित होते. कृत्रिमरीत्या फळे पिकविली तर त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो हे वास्तव नाकारता येत नाही. झटपट नफा कमावण्यासाठी सर्रासपणे फळविक्रेते रसायनांचा वापर करीत आहेत. अशा नैसर्गिकरीत्या पिकविलेल्या फळांमुळे फळांचे सत्व कमी होते, फळांमध्ये रसायनांचा अंश उतरून अशी फळे आरोग्यासाठी घातक ठरतात. अनेक रोगांना बळी पडावे लागते, कधीकधी विषबाधा होऊन आरोग्य धोक्यात येते. यासाठी शासन व प्रशासनाने कृत्रिमरीत्या फळे पिकविण्यावर कायमस्वरूपी बंदी घालण्याची नितांत गरज आहे.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**यांत्रिक कामे**
निविदा सूचना क्रमांक GEM/2025/B/6901048
दिनांक-२४.११.२०२५
डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवीत आहेत. **१. परिसरासह कामाचे नाव:** सोलापूर विभागातील पंढरपूर स्थानकावरील प्लॅटफॉर्म रिटर्न (आरबीपीसी)/टर्मिनल गाड्यांच्या यांत्रिक अंतर्गत साफसफाई आणि पाणीपुरवठा करण्याचे कंत्राट GEM मार्फत मनुष्यबळावर तीन वर्षांच्या कालावधीसाठी. **२. निविदा प्रणाली:** दोन पॅकेट प्रणाली. **३. कामाची अंदाजे किंमत:** रु. १,०६,००,३४५.९२/- **४. निविदा फॉर्मची किंमत:** शुन्य **५. निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता:** डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. **६. जमा करावयाची बयाणा रक्कम:** रु. २,०३,०१०/- **७. काम पूर्ण करण्याचा कालावधी:** काम सुरू झाल्यापासून तीन वर्षे. **८. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** १७.१२.२०२५ रोजी १०.०० वा. **९. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** १७.१२.२०२५ रोजी १०.३० वा. **१०. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक असलेले ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल.:** www.gem.gov.in/ ANJ-66
तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग काम**
डीआरएम (एस अँड टी) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित केली आहे. **क्र.: १ परिसरासह कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध स्थानकांवर फिरणारे क्षेत्र आणि संपर्क रस्ते यांच्यासह वस्तू शेडच्या विकासासाठी एस अँड टी केबलचे संरक्षण/स्थलांतर आणि एफओआयएस कनेक्टिव्हिटीची तरतूद. **निविदा क्रमांक:** एसयूआर-एन-टी- २०२५-२६-२६ **कामाची किंमत:** रु. ६०,७४,७०४.१२ **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य **जमा करावयाची बयाणा:** रु. १,२१,५००.०० **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ८ महिने **www.ireps.gov.in** वर **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ** १८.१२.२०२५ रोजी १५.३० वा. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ईमेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या. ANJ-65
तुमच्या प्राण्यांना रेल्वे लाईनपासून दूर ठेवा



टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६